रायगड, गुरूवार दि. ६ जुलै २०२३

कृषीवल

किंमत ४ ₹

दरडमुक्तीसाठी बांबू लागवड वरदान

पान ६ वर

भारतीय संघाच्या बांधणीचे लक्ष्य

पान ८ वर

'विठ्ठला'च्या पायी थरारली वीट ?

तुम्ही आमचे दैवत.. पण आता निवृत्त व्हा

अजित पवार यांचा हल्लाबोल

> राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी मला खूप प्रेम दिले. मी चार-पाचवेळा उपमुख्यमंत्री झालो. पण गाडी तिथेच थांबते, पुढे काही जात नाही. मलाही असं वाटतं की, मी राज्याचा प्रमुख व्हावं. माझ्या मनात काही गोष्टी आहेत. त्या राबवायच्या असतील तर राज्याचं प्रमुखपद मिळवणे गरजेचे आहे,
> अजित पवार,उपमुख्यमंत्री

तुम्ही आमचे विठ्ठल आहात, आता या वयात आशीर्वाद देण्याऐवजी आमच्यावरच कारवाई करीत आहात, हे अत्यंत वेदनादायक असून, काका आता तुम्ही निवृत्त व्हा, थांबा, असे जाहीर आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी थेट शरद पवार यांनाच केले. पक्षाध्यक्षपदाचा राजीनामा द्यायचा नव्हता तर देण्याचे नाटक केलेच कशाला असा संतप्त सवालही त्यांनी समर्थक मेळाव्यात केला. मुंबईतील एमआयटी येथे झालेल्या पहिल्याच मेळाव्यात बोलताना अजित पवारांनी आपल्या मनातील तळमळ आणि मळमळ बाहेर काढली.ती काढताना शरद पवारांवर हल्लाबोलही केला.

राष्ट्रवादीतून बंड केल्यानंतर अजित पवार यांच्या गटाची बुधवारी (५ जुलै) पहिलीच जाहीर सभा झाली.

या सभेत छगन भुजबळ, प्रफुल्ल पटेल, धनंजय मुंडे, रुपाली चाकणकर यांनी घणाघाती भाषणं केल्यानंतर अजित पवार यांनीही डॅशिंग अंदाजात भाषण केलं. शरद पवार यांच्या राजकीय कारकीर्दीची त्यांनी एकप्रकारे चिरफाडच केली.

साहेबांनी समाजवादी काँग्रेस, मूळ काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसमधून राजकारण केलं. वयाच्या पंचवीशी पासून पंच्याहत्तीपर्यंत उत्तम काम शकतो, असं सांगतानाच अजित पवार यांनी शरद पवार यांच्या राजकीय कारकिर्दीचा आढावा घेतला. सोनिया गांधी

•> पान २ वर

मी दुसऱ्याच्या पोटी जन्माला आलो म्हणून

शासकीय अधिकारी असो वा उद्योपती किंवा राजकारणी.. पण वरिष्ठ नेते थांबालयाच तयार नाहीत. ते खूप हट्टी आहेत? पण हे नेमकं कशासाठी? मी सुप्रियाला सांगितलं की तू साहेबांशी बोल, समजावून सांग... पण नाही, त्यांना थांबायचंच नाही. तरुण नेतृत्वाला त्यांना आशीर्वाद द्यायला काय हरकत आहे? मी कुणाच्या पोटी जन्माला आलो नाही, हा माझा दोष आहे का? चुकलं तर चुकलं म्हणून सांगा, पण तसं ते करत नाही, असा हल्लाबोल करताना मागील महिन्यातही त्यांनी राजीनामा दिला आणि तो परतही घेतला. मग राजीनामा परत घ्यायचाच होता तर दिला कशाला? असा रोकडा सवाल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शरद पवार यांना केला.

। मुंबई । प्रतिनिधी।

काही वर्षांपूर्वी वांद्र्यातील एका पुतण्याने पक्ष सोडत असताना आपल्या नेत्याला विठ्ठल आणि त्याच्या आजूबाजूच्यांना बडवे म्हटले होते. बुधवारी वांद्र्यात दुसऱ्या एका पुतण्याच्या सभेत याच विठ्ठलाची आणि त्याच्या भोवतीच्या बडव्यांची उजळणी झाली. फरक इतकाच की, आज पुतण्याने खुद्द आपल्या विठ्ठलावरही असा काही जोरदार हल्ला चढवला की त्याच्या पायाखालची वीटच थरारावी आणि सरकावी. राष्ट्रवादीच्या वांद्र्यातील मेळाव्यात अजितदादा पवार गटाच्या नेत्यांनी शरद पवार हे आमचे विठ्ठल, गुरु आणि दैवत आहेत असे पुन्हापुन्हा सांगितले. मात्र या दैवतानेच दादांवर अन्याय केला असेही ते म्हणाले. खुद्द अजितदादांनी काकांवर नाव न घेता न तुफान हल्ला चढवला. भाजपसोबत युती करावी यासाठी खुद्द शरद पवार यांनी २०१४ पासून अनेकवार कसे प्रयत्न केले होते व त्याच्या कशा बैठका झाल्या होत्या याचा पाढा त्यांनी वाचला. काकांनी त्यांच्या मनाला येईल तसे पक्षाचे धोरण बदलले आहे असे दादांचे म्हणणे होते. तुमचे वय झाले, आता बाजूला व्हा असा थेट सल्लाही त्यांनी दिला. दुसरीकडे 'विठ्ठला'ने मात्र शांतपणे आपल्या 'भक्तां'च्या तक्रारींचा प्रतिवाद केला. अजितदादांच्या या आरोपांना उत्तर देण्याचे शरद पवार यांनी टाळले तरी, छगन भुजबळांवर त्यांनी नाव न घेता जोरदार टीका केली. भाजपची मोदी राजवट ही देशात धार्मिक विद्वेष पसरवणारी व विरोधकांची मुस्कटदाबी करणारी असल्याचा आरोप करून आपल्या आगामी प्रचाराची दिशा स्पष्ट केली.

पवारांचा धोबीघाट : आजचा अग्रलेख

अरे पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली...

शरद पवारांचे आवाहन

> आज अनेकांनी वेगळी भूमिका घेतली, त्याबद्दल माझं काही मत नाही, पण पक्षाच्या ज्या कार्यकर्त्यांनी निवडून दिलं त्यांना विश्वासात न घेता वेगळी भूमिका घेतली गेली काही केलं तर पक्ष आणि चिन्ह जाणार नाही, ते जाऊ दिलं जाणार नाही.त्यावर आपलाच अधिकार असणार आहे.
> शरद पवार,अध्यक्ष,राष्ट्रवादी

असली राजकीय संकटे मला नवीन नाहीत. त्यातून कसे तरायचं हे मला चांगले माहित आहे.त्यामुळे तुम्ही काळजी करु नका, पक्ष आणि चिन्ह आपल्यापासून कुणीही हिरावून घेऊ शकणार नाही.असा छातीठोकपणे दावा करीत राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी अरे पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली, असा संदेशच पक्षाच्या युवाशक्तीला दिला.

अजित पवारांच्या बंडाच्या पार्श्वभूमीवर यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये शरद पवार समर्थकांचा मेळावा आयोजित केला होता. यावेळी पवारांनी अजित पवारांच्या सभेबाबत बोलताना ते म्हणाले की,

त्यांच्या सभेत माझ्याबद्दल काही बोलले. परंतु तिथं सगळ्यात मोठा फोटो माझा होता, बॅनर लावला त्यात फोटो माझा होता. त्यांना माहितंय आपलं नाणं चालणार नाही-खणकन वाजत नाही, त्यामुळे माझे फोटो वापरत आहेत. गुरु म्हणायचं, पांडुरंग म्हणायचं आणि दुसरीकडे टीका करायची, असं म्हणून पवारांनी संयमितपणे अजित पवार गटाचा समाचार घेतला.

भोपाळच्या सभेमध्ये पंतप्रधानांनी राष्ट्रवादीला भ्रष्टाचारी म्हटलं, पण दोन दिवसांपूर्वी झालेल्या शपथविधीत राष्ट्रवादीच्या मंत्र्यांना कशी शपथ दिली असा सवाल पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपला केला. विरोधकांना एकत्रित करण्याचं काम सुरू आहे, त्यामुळे पंतप्रधान अस्वस्थ झाल्याचंही ते म्हणाले. आज आपल्यासमोर संकटे आहेत, ज्यांचे विचार देशाच्या हिताचे नाहीत त्यांच्या हातात आज देशाची सूत्रे आहेत असे शरद पवार यांनी आपल्या भाषणातून सांगितले.

केंद्रामध्ये मी अनेकांच्या मंत्रिमंडळात काम केलं. लोकशाहीमध्ये विरोधी असो वा सहकारी असोत, त्यांच्यात सुसंवाद असावा लागतो. जो काही निर्णय घेतला जातो त्यावर सर्वसमान्यांची प्रतिक्रिया काय आहे हे जाणून घ्यावं लागतं. आज देशामध्ये हा संवाद नसल्याबद्दलही नाराजी व्यक्त केली.

पवार गटाकडील आमदार, खासदार

शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील •> पान २ वर

राजकीय चिखलफेक दुर्दैवी-उज्ज्वल निकम

। अलिबाग । प्रतिनिधी ।

राज्यातील राजकीय चिखलफेक अत्यंत दुर्दैवी असून,या चिखलफेकीत सर्वसामान्यांकडे राजकीय पक्षांचे दुर्लक्ष होणे हे खेदजनक असल्याची प्रतिक्रिया ज्येष्ठ विधीज्ञ उज्वल निकम यांनी अलिबाग येथे कृषीवलशी बोलताना व्यक्त केली.

अलिबागमध्ये एका कार्यक्रमाच्या निमित्ताने आलेल्या निकम यांनी राज्यातील घडत असलेल्या राजकीय संघर्षाबाबत आपले मत व्यक्त केले.ते पुढे म्हणाले की, आरोप प्रत्यारोपांच्या ज्या फैरी झडत आहे, त्याच्याबाबत व्यक्तीशः अचंबित, आश्चर्यचकीत झालो आहे. राजकारण म्हटले की आरोपांचे राळ होऊ शकतात हे मी मान्य करू शकतो. परंतु चिखलफेक आणि मतदारांचे कोणीही विचार करत नाहीत. ही अत्यंत वाईट गोष्ट आहे. जे काही व्हायला हवे ते चार भिंतीच्या आत व्हायला हवे. परंतु जेव्हा •> पान २ वर

दादांच्या प्रवेशाने शिंदे गट अस्वस्थ

। मुंबई । प्रतिनिधी ।

भाजपसमवेत राज्यकारभार सुरळीत सुरु असतानाच अचानकपणे सरकारमध्ये राष्ट्रवादीचे नेते अजित पवार हे ४० समर्थक आमदारांसह सहभागी झाल्याने सत्ताधारी शिंदे गटात कमालीची अस्वस्थता आणि संताप निर्माण झाला आहे.नुकत्याच झालेल्या शपथविधी सोहळ्यानंतर याचे तीव्र पडसाद उमटू लागल्याने या नाराज समर्थकांना सावरायचे कसे याचीच चिंता आता मुख्यमंत्री शिंदे याना लागली आहे.या आमदारांना शांत करण्यासाठी मुख्यमंत्री एकानाथ शिंदे यांच्या वर्षा या निवासस्थानी शिवसेनेचे मंत्री, नेते, खासदार आणि आमदारांची बैठकांचे सत्र सुरु झाले आहे.

या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शिवसेना पक्ष संघटना राज्यातील गाव, वाडी वस्ती पातळींवर मजबूत करण्यासाठी मार्गदर्शन करत आहेत. तसेच शिवसेना पक्ष कार्यकारणीने राज्यातील जिल्हा निहाय संपर्क प्रमुख आणि जिल्हा प्रमुखांना एक शिवसेना मंत्री जोडून जनतेच्या विकासांची कामं वेगाने पूर्ण करण्यासांठी सहकार्य केले जाणार आहे. येणाऱ्या सर्व निवडणुकांसाठी शिवसेना संघटना बळकट करण्यासाठी आतापासूनच शिवसेनेने मोर्चेबांधणी सुरू केली असल्याचे दिसत आहे.उपलब्ध माहितीनुसार संसद अधिवेशनानंतर मुख्यमंत्री शिंदेंदसह १८ आमदारांना अपात्र ठरविले जाणार आहे. त्याऐवजी अजितदादा यांना मुख्यमंत्री करण्याचा घाट भाजपने घातला आहे.

अधिवेशनानंतर बदल होणार

राष्ट्रवादीत बंडाळी करून पक्षावर दावा केलेल्या अजित पवार आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात झालेल्या वाटाघाटीनुसार संसदेचे पावसाळी अधिवेशन ११ ऑगस्ट रोजी संपल्यानंतर विद्यमान मुख्यंमत्री एकनाथ शिंदे यांना डच्चू देऊन महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदी अजित पवार विराजमान होईल, असा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबत रेडिफ या वेबसाईटने वृत्त दिले आहे.

अजित पवारच राष्ट्रीय अध्यक्ष

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

शरद पवारांऐवजी अजित पवार हेच राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष आहेत अशा आशयाचा ठराव मांडणारं ४० आमदारांचं एक पत्र निवडणूक आयोगामध्ये दाखल करण्यात आलं आहे. तशा आशयाचा ठराव पक्षाच्या आमदारांनी मंजूर केल्याचं या पत्रात नमूद करण्यात आलं आहे. ज्या दिवशी शपथविधी झाला त्याच्या दोन दिवस आधीच अजित पवारांनी पक्षाच्या ४० आमदारांचं पत्र निवडणूक आयोगात दाखल केल्याचं स्पष्ट झालं आहे.

ज्या दिवशी अजित पवारांचा शपथविधी पार पडला त्याच्या आधी दोन दिवस हे पत्र निवडणूक आयोगात दाखल केल्याचं समोर आलं आहे. या पत्रावर ज्या ४० आमदारांच्या सह्या आहेत त्या जून महिन्यातील असल्याची माहिती आहे.

चिन्हाची लढाई

अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर आता राष्ट्रवादी पक्षावर आणि चिन्हावर दावा केला आहे. आपल्याला पक्षातील बहुसंख्य आमदारांचा पाठिंबा असल्याचा दावाही त्यांनी केला.

मंगळसूत्र चोरांचा थरारक पाठलाग

। शिहू । वार्ताहर ।

महिलांच्या गळ्यातील मंगळसुत्रे खेचून पळून जाणाऱ्या दोन अट्टल सराईत चोरट्यांना थरारक पाठलाग करुन पकडण्यात नागोठणे पोलिसांना यश आले आहे.

तरशेत येथील माधुरी गिरीश नाईक या मंगळवारी (४ जुलै) दुपारी शिहू फाटा येथे त्यांच्या मुलाला शाळेतून घरी घेऊन जात असताना पेझारी नागोठणे रस्त्याने शिहू बाजूकडून एका स्कूटी वरून येऊन त्यावरील एक इसम खाली उतरून त्यांना वडखळकडे जाण्याचा रस्ता कुठे आहे असे विचारण्याचा बहाणा करून त्या बेसावध असताना फिर्यादी यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र व सोन्याची चैन असे एकूण १,६८,००० रुपयांचे दागिने जबरी चोरी करून सोबत आणलेल्या स्कूटी वरून नागोठणे बाजूकडे पळून गेले आहेत अशी बातमी नागोठणे पोलीस स्टेशनमध्ये दूरध्वनी वरून मिळताच नागोठणे पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पोमण यांनी तत्काळ नाकाबंदी केली. परंतु सीसीटीव्ही कॅमेरे चेक केले असता दोन्ही आरोपी स्कूटी वरून वडखळ बाजूकडे जात असताना दिसून आले म्हणून तत्काळ वडखळ पोलिस ठाण्याचे •> पान २ वर

रायगड जिल्ह्यात आज रेड अलर्ट

। रायगड । प्रतिनिधी ।

गेल्या काही दिवसांपासून पावसाने चांगलाच तडाका लावला आहे. सतत पडणाऱ्या पावसामुळे जनजीवन पुरते विस्कळीत झाले आहे. त्यातच आता भारतीय हवामान विभागाने ६ जुलै २०२३ रोजी रायगड जिल्ह्यासाठी रेड अलर्ट जारी केला आहे. जिल्ह्यातील काही ठिकाणी अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता असल्याने जिल्हा प्रशासनाने सर्व नागरिकांना तसेच यंत्रणांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

प्रशासनाने केलेल्या सूचना

दरडग्रस्त, पूर प्रवण, खाडीलगत सखल भागातील नागरिकांनी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा, पुलावरून पाणी वाहत असल्यास धाडसाने वाहने पाण्यातून चालवू नये, मासेमारीसाठी खाडी, तलाव, समुद्रात जावू नये, दरड प्रवण गावांतील नागरिकांनी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा, जिल्ह्यातील सर्व सरकारी यंत्रणांनी आपल्या विभागांची मशीनरी मनुष्यबळासह तत्पर ठेवावी. कोणत्याही आपत्कालीन प्रसंगी जवळच्या पोलीस स्टेशन अथवा तहसील कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

राज्यात मान्सून उशिरा दाखल झाला असला, तरी •> पान २ वर

टोमॅटोला आला पेट्रोलचा भाव,

- आवक घटल्याने दर कडाडले
- सामान्यांना फटका

। रायगड । प्रतिनिधी ।

सध्या मान्सून सर्वत्र चांगलाच सक्रिय झाला आहे. पावसाचा जोर वाढल्यामुळे भाज्यांचे दर कडाडले आहेत. आधी उन्हामुळे शेतकऱ्यांची पिके करपली होती, त्यानंतर अवकाळीने चांगलाच गोंधळ घातला होता. आता तर, पावसामुळे पिकांची नासाडी होताना दिसत आहे. आवक घटल्याने परिणामी भाज्यांचे दर गगनाला भिडले आहेत. यामध्ये सध्या टोमॅटो १००-१२० रुपये किलोला म्हणजेच पेट्रोलच्या किमती मध्ये विकला जात असल्याने तो अधिक भाव खाऊन जात आहे. परंतु दर वाढल्याने किचनमधून टोमॅटो गायब झाला आहे.

काही महिन्यांपूर्वी उत्तर प्रदेश, मध्यप्रदेशसह महाराष्ट्रात टोमॅटो २-८ रुपये किलो होते. पण पावसाळ्याच्या तोंडावरच किंमतींनी जोर पकडला. भाव एकदम गगनाला भिडले. सुरुवातीला ८० रुपये किलो दराने टोमॅटोची विक्री झाली. आता तर काही भागात टोमॅटोचा दर १००-१२० रुपये प्रति किलोवर पोहचला आहे. त्यामुळे सहाजिकच किचनच्या बजेटवर ताण आला आहे. पूर्वी दोन तीन किलो टोमॅटो घेऊन जाणारा ग्राहक •> पान २ वर

टोमॅटो	१००-१२० रु./किलो
आले	३२० रुपये/किलो
घोसळी	५० रुपये/किलो
भेंडी	६० रुपये/किलो
कारले	६० रुपये/किलो
भोपळा	५० रुपये/किलो
फ्लॉवर	६० रुपये/किलो
कोथिंबीर	४०-५० रुपये जुडी
बिट	८०-९० रुपये किलो

भाज्यांचे दर गगनाला भिडले

बाजारात कोणतीही भाजी ५० रुपये किलोच्या खाली मिळत नाही. टोमॅटोचे दर १००-१२० रुपये आहेत. आल्याच्या किमतीतही प्रचंड वाढ झाली आहे. आले विक्रमी किमतीला विकले जात आहे. पाव किलो आले ८० ते १०० रुपयांना विकले जात आहे. वाढत्या किमतीमुळे अनेक गृहिणी आले घेण्याचे टाळताना दिसत आहेत. यापूर्वी रखरखत ऊन आणि आता मुसळधार पाऊस यामुळे भाज्यांच्या उत्पादनात ७० टक्क्यांनी घट झाली आहे. टोमॅटो, कारली, भेंडी,गवार, फ्लॉवर, कोबी, मिरची, भोपळा यासह अनेक भाज्या महागल्या आहेत. •> पान २ वर

कोकण आयुक्तांच्या दांडीने बैठकीचा बट्ट्याबोळ

प्रशासनाला गुंडाळावे लागले 'रेडकार्पेट'

आविष्कार देसाई

। रायगड ।

घरी एखादा पाहुणा येणार असला की, घर कस आपण टापटीप, स्वच्छ ठेवतो. त्यातच जर का पाहुणा अती महत्वाचा असला तर घराचे सुशोभिकरण देखील करतो. परंतू तोच पाहुणा आला नाही तर यजमानांचा चांगलाच हिरमोड होतो आणि केलेला खर्च देखील वाया जातो. अशीच परिस्थिती आज रायगड जिल्हा परिषद प्रशासनावर ओढवल्याचे दिसून आले. प्रशासकीय कामांचा आढावा घेण्यासाठी कोकण आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर येणार होते. मात्र आयत्या वेळी त्यांनी दांडी मारल्याने बट्ट्याबोळ झाला. उपायुक्तांवरच आढावा घेण्याची वेळ आली. तसेच जिल्हा प्ररिषद प्रशासनाला रेड कार्पेट गुंडाळून ठेवावे लागले.

आढावा घेण्याची उपायुक्तांवर आली वेळ

रायगड जिल्हा परिषदेवर गेल्या काही महिन्यांपासून प्रशासक म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील हे कामकाज पाहत आहेत. रायगड जिल्हा परिषद सदस्यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्याने जिल्हा परिषदेचा गाडा प्रशासनामार्फत हाकण्यात येत आहे. सार्वजनिक बांधकाम, सामान्य प्रशासन, अर्थ विभाग,महिला व बालकल्याण, कृषी, समाज कल्याण, आरोग विभाग, ग्रामीण पाणी पुरवठा, शिक्षण यासह अन्य विभाग कार्यरत आहेत. नागरिकांच्या विकासा संबधी देखील विविध कामे, योजना अथवा सेवा देण्याचे काम जिल्हा प्रशासनामार्फत सुरु असते. सध्या हे सर्व विभाग हे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या अंमलाखाली आहेत.

• रायगड जिल्हा परिषदेमध्ये आयुक्तांसाठी अंथरलेले रेड कार्पेट

प्रशासकीय पातळीवर कामकाज सुरळीत सुरु आहे का याची पाहणी आयुक्तांमार्फत करण्यात येते. हा कामाचाच भाग आहे. त्यानुसार बुधवारी (५ जुलै) कोकण आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर हे रायगड जिल्हा परिषदेच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी येणार होते. त्यांनीच सदरची तारीख आणि वेळ •> पान २ वर

> रायगड जिल्हा परिषदेमध्ये ते पहिल्यांदा येणार होते म्हणून तयारी केली होती. मात्र काही कारणांनी डॉ. कल्याणकर येऊ शकले नाहीत. उपायुक्त गिरीश भालेराव आणि उपायुक्त डि.व्हाय.जाधव हेच आढाव घेतील,
> डॉ. किरण पाटील,
> सीईओ,रायगड जि.प.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही मेळाव्यात परस्परांवर आगपाखड

साहेब बडव्यांना बाजुला करा

। मुंबई । प्रतिनिधी ।

शरद पवार आम्हाला सांगतात की, माझा फोटो बॅनर्सवर वापरु नका. पण पवार साहेब हा आमचा विठ्ठल आहे. या विठ्ठलाला बडव्यांनी घेरलं आहे. या बडव्यांना बाजूला करा, आम्ही सगळे तुमच्याकडे परत येऊ. आपण एकत्र सत्तेत बसू, असे वक्तव्य छगन भुजबळ यांनी केले. ते बुधवारी मुंबईत अजित पवार गटाच्या मेळाव्यात बोलत होते. यावेळी छगन भुजबळ यांनी आक्रमक शैलीत शरद पवार यांच्या राजकारणाचे आणि कार्यपद्धतीमधील दोष दाखवून दिले. तुम्ही वसंतदादा पाटील यांना सोडून बाहेर पडलात तेव्हा त्यांनादेखील असेच वाईट वाटले असेल, हे वाक्य बोलून छगन भुजबळ यांनी शरद पवार यांना एकप्रकारे आरसा दाखवला.

साहेब आपण वसंतदादांना सोडलं तेव्हा त्यांनाही असंच वाईट वाटलं असेल. बाळासाहेब ठाकरे यांच्याशी मतभेद झाल्यानंतर मी शिवसेनेतून बाहेर पडल्यानंतर बाळासाहेब आणि माँसाहेबांनाही इतकंच वाईट वाटलं असेल. तुम्ही मला तेव्हा तिकडेच थांबा, असे सांगितले नाही. तुम्ही धनंजय मुंडे यांना राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आणले तेव्हा गोपीनाथ मुंडे आणि पंकजा मुंडे यांच्या डोळ्यातही असेच अश्रू तरळले असतील, असे छगन भुजबळ यांनी म्हटले. छगन भुजबळ यांच्या भाषणातील ही मांडणी पाहता अजित पवार गटाने आता कोणत्याही परिस्थितीत नमते घ्यायचे नाही, अशी भूमिका घेतल्याचे दिसत आहे.

भुजबळ यांनी आपल्या भाषणात शरद पवार यांच्या कार्यपद्धतीवर आसूड ओढले. आपण कोणासोबतही गेलो तरी विचारधारा कायम राहिली पाहिजे. धरसोड वृत्तीचे राजकारण करुन चालणार नाही. २०१९ च्या निवडणुकीआधी किंवा नंतर काय बोलणी झाली होती. अजित पवार उगाच सकाळी उठून शपथ घेण्यासाठी गेले का? आपण वारंवार दिल्लीत चर्चा करायची आणि काही दिवस झाले की त्यामधून माघार घ्यायची. अशा राजकारणामुळे आपण अनेक नेत्यांना तोंडघशी पाडतो, हेदेखील लक्षात कसे येत नाही. साहेबांनी राष्ट्रीय अध्यक्षपदाचा राजीनामा दिला, अजितदादा म्हणाले मला प्रदेशाध्यक्ष व्हायचंय. आम्हाला ना काका सांगत ना पुतण्या, निवडी जाहीर झाल्यावर समजतं, अशी खंतही यावेळी छगन भुजबळ यांनी बोलून दाखवली.

> साहेब अजूनही काही बिघडलेले नाही. तुम्ही तुमच्याभोवतीच्या बडव्यांना बाजूला करा आम्ही सगळे तुमच्याकडे परत येऊ. तुम्ही नागालँडमध्ये राष्ट्रवादीच्या आमदारांना भाजपसोबत सत्ता स्थापन करण्याची परवानगी दिली, त्यांचा सत्कार केला. मग आमचाही सत्कार करा, आपण एकत्र सत्तेत बसू,
>
> छगन भुजबळ,मंत्री

मी या मंचावर का : प्रफुल्ल पटेल

यावेळी प्रफुल्ल पटेल म्हणाले, मी या मंचावर का आणि त्या मंचावर का नाही? असा प्रश्न अनेकांना पडला आहे. संपूर्ण देश आणि महाराष्ट्र या प्रश्नाचं उत्तर शोधतोय. पंरतु याचं उत्तर मी तुम्हाला आज देणार नाही. त्याची योग्य वेळ येऊ द्या. तुम्हाला आवश्यक असलेला खुलासा मी करणार आहे. आज छगन भुजबळ, धनंजय मुंडे आणि सुनील तटकरे यांनी त्याचे संकेत दिले आहेत. मी ही यावर सविस्तर बोलेन. त्यावर आपण कधी ना कधी नक्कीच चर्चा करणार आहोत आणि तुम्हाला तुमचं उत्तर मिळणार आहे.

'त्यावेळी बडवे आडवे आले नाहीत का'

शरद पवार यांच्या खुर्चीच्या डाव्या-उजव्या बाजूला बसणारे लोक आज त्यांच्या आजूबाजूला नाहीयेत. आज मला त्याची खूप मोठी खंत वाटत आहे. पण साहेबांनी एवढं सगळं दिल्यानंतरही लोक सोडून गेले, याचा रागही येत असल्याबद्दल प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी संताप व्यक्त केला.

तिकडच्या सभेत सांगितलं की, माझ्या विठ्ठलाला बडव्यांनी घेरलंय. २०१९ ला उद्धव ठाकरेंनी शपथविधीवेळी विचारलं, तुमची दोन नावं द्या. त्यावेळी पवारसाहेबांनी क्षणाचाही विलंब न लावता भुजबळसाहेबांचं पहिलं नाव सांगितलं. मग त्यावेळी बडवे आडवे आले नाहीत का? जेलमधून बाहेर आल्यानंतर तुमचं पुण्यात हजारोंच्या साक्षीने मोठ्या थाटात स्वागत केलं. तुमच्या डोक्यावर फुले पगडी घातली, त्यावेळी बडवे आडवे आले नाहीत का? असे सणसणीत प्रश्न विचारले.

पोरापेक्षा पोरगी बरी!

सुप्रिया सुळे यांनी अजित पवार यांना चोख उत्तर दिले. यावेळी सुप्रिया सुळे यांनी रतन टाटा, अमिताभ बच्चन आणि सायरस पूनावासा यांच्या नावाचा उल्लेख करत, वय हा फक्त एक अंक असल्याचे प्रतिपादन केले. पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, जेव्हा जेव्हा घरावर अडचण येते, तेव्हा वडीलांबरोबर लेक असते. आपल्या वडीलांना म्हणायचं तुम्ही घरी बसा आणि आशीर्वाद द्या, मग त्यापेक्षा आम्ही पोरी परवडल्या. अशा शब्दात त्यांनी दादा गटाला सुनावले.

अमोल कोल्हे प्रचारप्रमुख

आता पक्षातली गर्दी कमी झाली आहेत सांगतानाच प्रदेशाध्यक्ष या नात्याने जयंत पाटील यांनी अमोल कोल्हे यांना मोठी ऑफरच दिली. शरद पवार यांच्या आजूबाजूला बसणारे नेते आज आपल्यासोबत नाहीयेत. खुर्च्या रिकाम्या झाल्यात. आता अनेकांना संधी देण्याची वेळ आली आहे. अमोल कोल्हे यांची व्हिडीओ क्लिप मी काल ऐकली. बापाला कधी विसरायचं नसतं, असं ते व्हिडीओमध्ये सांगत होते. बापाच्या चेहऱ्यावर सुरकुत्या आल्या म्हणजे त्या कष्टाने आलेल्या असतात, याची सगळ्यांनाच जाणीव आहे. अमोल कोल्हे यांना माझी प्रदेशाध्यक्ष या नात्याने विनंती आहे, आपल्या पक्षाचं प्रचारप्रमुखपद आपण स्वीकारा. महाराष्ट्र पिंजून काढू, शिवरायांचा विचार सांगू, पुन्हा महाराष्ट्रात आपल्या विचारांचं सरकार आणू... अशी ऑफरच जयंतरावांनी अमोल कोल्हे यांना दिली. त्यावर अमोल कोल्हे यांनी चेहऱ्यावर स्मितहास्य आणून हात जोडून जसा आपला आदेश म्हणत त्यांची ही ऑफर मान्य असल्याचंच एकप्रकारे सांगितलं.

खा. कोल्हे भावूक

सभेमध्ये कोल्हे म्हणाले की, श्रीकृष्णाने गोवर्धन करंगळी वर उचलला ती भूमिका आता साहेब बजावत आहेत. त्यांची भूमिका महत्वाची आहे. कितीही अडचणींचे आभाळ आले तरीही आपण त्यांना सामोरं जायला तयार आहोत. आज पवार साहेब बरोबर उभे राहताना मला वाटते की, माझ्या बापानं स्वाभिमानानं अनेकांना कष्टानं चटणी भाकरी दिली.हे सांगताना ते भावूक झाल्याचेही दिसून आले.

पुन्हा जोमाने उभारु-रोहित पाटील

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जाऊ आणि शरद पवार साहेबांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस एक नंबरचा पक्ष करु असा विश्वास राष्ट्रवादीचे युवा नेते रोहित पाटील यांनी व्यक्त केला. येणाऱ्या काळात साहेबांच्या नेतृत्वात जास्तीत जास्त जागा निवडून येतील यासाठी काम करणार असल्याचे रोहित पाटील म्हणाले. सामान्य माणूस ही राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद असल्याचे पाटील म्हणाले. सध्या प्रसंग बाका असताना आपण सर्वांना एकत्र भूमिका घ्यावी लागेल. ज्याप्रमाणे मावळ्यांनी छत्रपती सिवाजी महाराजांसाठी वाटेल ते करण्याची भूमिका घेतली, तीच भूमिका पवार साहेबांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आपल्याला घ्यावी लागेल असे रोहित पाटील म्हणाले. साहेबांच्या विचारांची खूनगाठ आपण सर्वजण बांधूया आणि राज्यात पुन्हा आपली सत्ता आणू अशी शपथ घेऊयात असेही रोहित पाटील यावेळी म्हणाले.

बाबुराव भोनकर जयंती दिनी आरोग्य शिबीर

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव येथील कुणबी समाजाचे नेते स्व. बाबुराव भोनकर यांच्या जयंती दिनानिमित्त साले गावात श्री स्वयंभू गणेश मंदिर या ठिकाणी बाबुरावजी भोनकर सामाजिक विकास संस्थेमार्फत व उपजिल्हा रुग्णालय माणगाव, तालुका आरोग्य अधिकारी यांच्या सहकार्याने मोफत आरोग्य तपासणी शिबीर व तालुक्यातील विविध गावांत संस्थेतर्फे वह्या वाटप कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

शिबिरात मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या लोकांच्या विविध प्रकारच्या तपासण्या तज्ज्ञ डॉक्टरांकडून करण्यात आल्या. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माणगाव तालुका आरोग्य अधिकारी भारसाखळे कुणबी समाजनेते सहदेव बक्कम यांनी यावेळी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला डॉ. प्रियांका वाढवळ, डॉ. फलक मोहाळ, डॉ. मुकुंद जाधव, रुपाली चांदोरकर, राजेंद्र खाडे, बी. जी. कदम, महालॅबचे सुनील, राजेंद्र पवार, माणगाव पंचायत समितीचे माजी सदस्य शैलेश भोनकर, सहदेव बक्कम, महादेव खडतर, सखाराम खरंगटे, नितीन खडतर, अमित ढाकवळ, जनार्दन वडेकर, रामचंद्र भोनकर, नितीन चांदोरकर, काशीराम पाटील, अनिल जाधव, प्रकाश भोनकर, बाळाराम भोनकर, नथुराम भोनकर, सागर भोनकर, मधुकर बक्कम, दीपक चव्हाण, सहादेव भोनकर, राजेंद्र भोनकर, सखाराम भोनकर आदींसह साले गावातील व पंचक्रोशीतील ग्रामस्थ तसेच आरोग्य खात्याचे कर्मचारी उपस्थित होते.

सागर भोनकर यांनी स्वागत तर नितीन खडतर यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष शैलेश भोनकर यांचे विशेष अभिनंदन केले. तसेच या जयंतीदिनानिमित्त संस्थेमार्फत तालुक्यातील राजिप शाळा साले, तिलोरे, कोशिंबळे या शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिल असे शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

चौक येथील राम मंदिरात गुरुपूजन

। चौक । वार्ताहर ।

वारकरी संप्रदायात प्रतिष्ठित असलेले व्यक्तिमत्व प्रभाकर महाराज सालेकर यांचा चौक कोल्हापूर पेठेतील राम मंदिरात गुरु पूजनाचा कार्यक्रम पार पडला. या वेळी सालेकर महाराजांचे सहकारी राजेश थोरवे यांचाही

श्रीफळ व शाल देऊन सत्कार करण्यात आला.हा कार्यक्रम यशस्वी पार पडण्याकरिता आदर्श भजनी मंडळातले सहकारी अजय म्हामुणकर,मिलिंद पिंगळे,गणेश पिंगळे,भाग्येश भरतुक, अनिल भरतुक.तसेच अनेक मान्यवर मोठया संख्येने उपस्थित होते.

सचिन धुमाळ यांच्या बासरीवादनाची कार्यशाळा

। रायगड । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील धामणपाडा गावातील सुप्रसिद्ध बासरीवादक सचिन धुमाळ यांच्या बासरीवादनाच्या प्रशिक्षणाची कार्यशाळा नुकतीच पार पडली. अलिबाग तालुक्यातील विविध शाळेतील ९०० विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेचा लाभ घेतला.

आपल्या रायगड जिल्ह्यात अध्यात्मिक क्षेत्रामध्ये भजनासह, पारंपरिक गाणी आणि पारंपरिक वाद्यांना महत्त्व आहे. पण आपल्या जिल्ह्यातील विद्यार्थ्यांमध्ये बासरी या वाद्याबद्दल जागृती व्हावी, त्यांना या वाद्याची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने सचिन धुमाळ यांनी तीनवीरा, हाशिवरे, चोंढी, राजिप शाळा पेझारी, माध्यमिक शाळा शिहू, रिलायन्स फाउंडेशन स्कुल नागोठणे या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना विनामूल्य बासरी वादनाचे प्रशिक्षण दिले.

या कार्यक्रमांच्या माध्यमातून सचिन धुमाळ यांनी सुमारे ९०० विद्यार्थ्यांना बासरी या वाद्याची माहिती देऊन आपल्या शिष्यांसह बासरीवादन ऐकवले. काही विद्यार्थ्यांना रंगमंचावर उभे करून प्रत्यक्ष बासरीवर स्वरनिर्मिती करण्याचे प्रशिक्षणही दिले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सचिन धुमाळ म्युझिक कॅडमीच्या सर्व शिष्यांनी तसेच विविध शाळांमधील शिक्षकांनी परिश्रम घेतले.

पान १ वरुन

तुम्ही आमचे दैवत.. पण आता निवृत्त व्हा

परदेशी व्यक्ती या देशाच्या पंतप्रधान होऊ शकत नाही, असं त्यांनी सांगितलं. आपण ऐकलं. नंतर १९९९ ला राष्ट्रवादीची स्थापन झाली. त्यावेळी छगन भुजबळांनी मोलाचं काम केलं. आपल्याला ५८ जागा मिळाल्या. काँग्रेसला ७५ जागा मिळाल्या. त्यावेळी सरकार आलं. मी-आर आर पाटील-जयंत पाटील-सुनील तटकरे यांनी मंत्री म्हणून काम केलं. मला पहिल्या टर्मला कृष्णा खोऱ्याचे ७ जिल्हे मिळाले. प्रशासनावर माझी पकड आहे की नाही, हे उभा महाराष्ट्र जाणतो. सकाळी-पहाटे कामाला सुरुवात करायचो-आजही करतो. मी कधीही जातीपातीचं राजकारण केलं नाही. नात्यागोत्याचं राजकारण केलं नाही. कशसाठी तर महाराष्ट्रासाठी... २००४ ला काँग्रेसचे ६९ आमदार होते, राष्ट्रवादीचे ७१ आमदार निवडून आले. सोनियाजींनी विलासरावांना सांगितलं राष्ट्रवादीच्या जागा जास्त आहेत, त्यांना सीएम पोस्ट द्यावी लागेल. त्यावेळी विलासरावांनी आम्हाला विचारलं, तुमच्यात सीएम कोण होईल..? चार मंत्रिपदं जास्त घेऊन, आलेली संधी सोडून देण्यात आली... पण ती संधी घेतली असती तर आजपर्यंत राष्ट्रवादीचाच मुख्यमंत्री महाराष्ट्राला दिसला असता,असा दावाही अजित पवारांनी केला.

आयुष्याचा पुन्हा पेटवा मशाली

बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेसचे एकूण १३ विधानसभा आमदार, ३ विधानपरिषद आमदार आणि ५ खासदार उपस्थित होते.त्या तुलनेने अजित पवार गटाकडे सर्वाधिक आमदार होते.

विधानसभा

अनिल देशमुख, रोहित पवार, राजेंद्र शिंगणे, अशोक पवार, किरण लहमटे, प्राजक्ता तनपुरे, बाळासाहेब पाटील, जितेंद्र आव्हाड, चेतन विठ्ठल तुपे, जयंत पाटील, राजेश टोपे, संदीप क्षीरसागर आणि देवेंद्र भुयार

खासदारः श्रीनिवास पाटील (लोकसभा), सुप्रिया सुळे (लोकसभा), अमोल कोल्हे (लोकसभा), फौजिया खान (राज्यसभा) आणि वंदना चव्हाण (राज्यसभा)

विधान परिषदः शशिकांत शिंदे, बाबाजानी दुराणी आणि एकनाथ खडसे

राजकीय चिखलफेक

चव्हाट्यावर बाजू मांडली जाते. तेव्हा तो सार्वजनिक चर्चेचा विषय बनतो. राजकारणातून चांगले संसद पट्टू निर्माण होतात. तेथे कायदे केले जातात. परंतू अशा प्रकारे राजकारण घडत असेल, तर लोकशाहीच्या दृष्टीकोनातूनही अत्यंत चिंतनीय बाब आहे. पक्षांतर बंदी कायद्यामध्ये बदल आणि दुरुस्ती ही आवश्यक आहे, असे उज्ज्वल निकम यांनी सांगितले. पुढे ते म्हणाले,

महाराष्ट्रातील सत्ता संघर्षाबाबत यापुर्वी शिंदे आणि ठाकरे गटात जो वाद उद्भवला होता.त्याबाबतीत सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापिठाने एक मुखी निर्णय दिलेला आहे. सर्वोच्च न्यायालयाचा एक महत्वाचा मुद्दा असा आहे, एखाद्या राजकिय पक्षाचा प्रतोद आणि नेता याला विधी मंडळात कोणी अधिष्ठान द्यावं. यासंदर्भातील अधिकार घटनेनूसार विधानसभेतील अध्यक्षाला आहेत. विधानसभेच्या अध्यक्षांची ही नैतिक जबाबदारी राहिल. की, त्या राजकिय पक्षाची घटना,आणि घटनेनुसार, कोणाला नियुक्त केले आहे. हे विधानसभेच्या अध्यक्षांनी पाहणे कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक राहिल. त्यासाठी दावे, प्रतिदावे होत असतील, तर त्याबाबत चौकशी करण्याचा अधिकार अध्यक्षांना दिले आहेत. अशी चौकशी त्यांनी विशिष्ट मुदतीत केली पाहिजे. त्यांना चौकशीसाठी जो वेळ लागेल, तो मिळेल, असेदेखील सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. अर्थात विधानसभेच्या अध्यक्षांवर असे आजच्या मितीस कुठेही घटनेच्या दृष्टीने बंधन नाही.अमुक मुदतीत त्यांनी निकाल दिला पाहिजे. सर्वोच्च न्यायालयात याबाबत एक याचिका दाखल करण्यात आली आहे. त्याबाबत सर्वोच्च न्यायालय काय निकाल देतो. हे बघणे महत्वपुर्ण ठरेल, असे उज्ज्व निकम यांनी सांगितले.

चोरांचा पाठलाग

पोलीस निरीक्षक तानाजी नारनवर यांना कळवून वडखळ पोलिसांना प्राप्त फुटेज पाठविण्यात आले. गुन्हाचे गांभीर्यओळखून वडखळ पोलिस स्टेशन येथे नाकाबंदी लावण्यात आली व तात्काळ आरोपींचा पाठलाग सुरू केला. वडखळ येथे मुंबई गोवा हायवे रोडवर नागोठणे पोलिसांनी वडखळ पोलिसांच्या मदतीने व प्राप्त सीसीटीव्ही फुटेज वरून दोन्ही आरोपी यांना चोरीच्या मुद्देमालासह व स्कूटी सह ताब्यात घेतले. सदर गुन्हा घडल्या पासून आरोपींचा थरारक पाठलाग करून नागोठणे पोलिसांनी वडखळ पोलिसांच्या मदतीने गुन्ह्यातील आरोपी अटक केले आहेत. या बाबत नागोठणे पोलिस स्टेशन गुन्हा रजी नं.९०/२०२३ भा. द.वी.कलम ३९२,३४प्रमाणे दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्याचे कामी सहा.पोलिस निरीक्षक संदीप पोमाण ,पोलिस हवालदार विनोद पाटील,पोलिस नाईक सचिन पाटील,पोलिस नाईक नितेश पाटील,पोलिस कॉन्स्टेबल रामनाथ ठाकूर ,पोलिस कॉन्स्टेबल सत्यवान पिंगळे,सायबर चे पोलिस हवालदार संतोष म्हात्रे यांनी सदरची कामगिरी बजावली.या बाबत अधिक तपास सहाय्यक पोलीस उप निरीक्षक प्रमोद कदम करीत आहेत.

रायगड जिल्ह्यात आज रेड अलर्ट

पावसाने चांगलाच जोर धरलेला आहे. गेल्या काही दिवसांपासून सातत्याने पाऊस बरसत असल्याने अलिबाग, पेण, पनवेल, उरण, कर्जत, खालापूर, रोहा, माणगाव, महाड यासह अन्य तालुक्यातील सकल भागांमध्ये पाणी साचले आहे. पावसाच्या दमदार हजेरीने मात्र बळीराजा सुखावला आहे. शेतीच्या कामांना चांगलाच वेग आला आहे.

भारतीय हवामान विभागाने ६ जुलै रोजी रायगड जिल्ह्याला रेड अलर्ट जारी केला आहे. याकालावधीत अतिमुसळधार पाऊस पडणार असल्याचा इशारा दिला आहे. जुलै महिन्यात वाजवी पेक्षा अधिक पाऊस बरसत असतो. या कालावधीत प्रचंड पाऊस पडत असल्याने नद्यांना महापुर येण्याच्या घटना घडल्या आहेत. त्याचप्रमाणे दरडी कोसळ्याच्या घटना घडून जिवीत हानी झाली आहे. हे सर्व समोर असल्याने जिल्हा प्रशासन रेड अलर्टमुळे सतर्क झाले आहे. आपत्ती संबंधीच्या सर्व विभागांना त्यांनी सुचित केले आहे.

रायगड जिल्ह्यातील सावित्री, आंबा, कुंडलीका, पाताळगंगा, उल्हास आणि गाढी या सर्व नद्या इशारा पातळीच्या खाली वाहत आहेत.

टोमॅटोला आला

आता फक्च पाव किलो टोमॅटोवर समाधान मानत आहे.व्यापाऱ्यांच्या मते, बाजाराता टोमॅटोचा तुटवडा आहे. टोमॅटोची आवक घटली आहे. माल कमी येत आहे. मागणी जास्त असून आवक कमी आहे. महाराष्ट्रातून टोमॅटो देशभरात जातो. तो अवघ्या २० टक्क्यांवर आला आहे. तर काही ठिकाणी काळाबाजार होत असल्याचा आरोप ग्राहकांकडून करण्यात येत आहे. पण भाव केवळ मेट्रो शहरातच वाढले आहेत, असे नाही, निम शहरात, तालुक्याच्या पातळीवर आणि खेड्यातील बाजारात पण टोमॅटोचे भाव वाढल्याचे दिसून येते.

दरवर्षी अशीच परिस्थिती

टोमॅटोच्या किंमती यापूर्वी पण वाढल्या आहेत. दरवर्षी एकदा टोमॅटोने ग्राहकांचा खिसा कापला आहे. पण त्याचा शेतकऱ्यांना किती फायदा झाला ते मात्र कोडेच आहे. गेल्यावर्षी २०२२ मध्ये टोमॅटोचे दर याच महिन्यात ६०-७० रुपये किलो, २०२१ मध्ये १०० रुपये तर २०२० मध्ये एक किलो टोमॅटोचा दर ७०-८० रुपये किलो होता.

यंदा उन्हाळ्यात कडक ऊन आणि अवकाळी पावसाने टोमॅटो पिकाचे नुकसान झाले. काही दिवसांपूर्वी टोमॅटोला भाव मिळत नसल्याने तो फेकून देण्याची वेळ आली होती. कृषी उत्पादने सुरक्षित ठेवण्याची तरतूद अथवा व्यवस्था नसल्याने परिणाम त्यामुळे ग्राहकांना प्रत्येक ऋतूत भाजीपाला कमी-जास्त दराने खरेदी करावा लागतो.

प्रशासनाला गुंडाळावे लागले 'रेडकार्पेट'

दिल्याने ही बैठक बोलवण्यात आली होती.

डॉ. कल्याणकर यांना टापटीपपणा खूप आवडतो. ते जेव्हा रायगडचे जिल्हाधिकारी होते. तेव्हापासूनच सर्वांना हे माहिती आहे. मात्र ते वेळेवर कधीच आलेले नाहीत हे देखील तितकेच खरे आहे. जिल्हाधिकारी असताना त्यांनी एखादी बैठक बोलवली आणि ती वेळेत सुरु झाली असेल असे खचितच घडले असावे. साहेब येत नसल्याने अन्य अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना तिष्ठत बसावे लागत होते. खासगीमध्ये याबाबत काही अधिकारी नाराजी देखील बोलवून दाखवत होते.

जिल्हा परिषद मध्ये डॉ. कल्याणकर येणार असल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी रेडकार्पेट टाकले होते. ठिकठिकाणी फुल झाडांच्या कुंड्या ठेवल्या होत्या. कॉरिडॉरमध्ये सुगंधी फ्रेशर्न पसरला होता. स्वागतासाठी गुलाब पुष्पांचे भले मोठे गुच्छ तयार ठेवले होते. बैठकीची तयारी झाली. ११ वाजता आयुक्त डॉ. कल्याणकर येणार होते. मात्र १२ वाजून गेले तरी, आयुक्तांचा पत्ता नव्हता. काही कालावधीनंतर कळले की, आयुक्तांचा दौरा रद्द झाला. त्यांच्या ऐवजी गिरीश भालेराव उपायुक्त (आस्थापना) आणि डि.व्हाय. जाधव उपायुक्त (विकास) यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित झाले. त्यांनीच डॉ. कल्याणकर यांच्या गैर हजेरीत जिल्हा परिषदेच्या कामांचा आढावा घेण्यास सुरुवात केली.याप्रसंगी रायगड जिल्हा परिषदचे उप मुख्यकार्यकारी अधिकारी निलेश घुले उपस्थित होते.

महाराष्ट्र शासन, गृह विभाग (बंदरे व परिवहन)
महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड
इंडियन मर्कन्टाईल चेंबर्स, दुसरा मजला, १४ रामजीभाई कमानी मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई- ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६९०४१७७७ फॅक्स क्र. ०२२-६९०४१७४०
Website : https://mahammb.maharashtra.gov.in
Email : ceo.mmb@maharashtra.gov.in/ceommb@gmail.com
ई-निविदा सूचना (सन २०२३-२४)
Main Portal : https://mahatenders.gov.in
Departmental Portal : www.mahammb.maharashtra.gov.in

मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व योग्य अनुभव असलेल्या ठेकेदाराकडून खाली नमूद केलेल्या कामासाठी बी-१ नमुन्यात ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

अ. क्र.	कामाचे नाव	कामाच्या निविदेची अंदाजित किंमत (रु.)	इसारा रक्कम (रू.)	कोऱ्या निविदेची किंमत (रू.)	काम पूर्ण करण्याचा कालावधी (महिन्यात)
१	दिघी येथे रो-रो सेवेकरीता अस्तित्वातील जेट्टीचे मजबुतीकरण करणे व लिंक स्पॅन पान्टून बसविणे.	४,०३,८७,६५९/-	२,०२,०००/-	२,३६०/-	१८ महिने (पावसाळा कालावधी धरून)

तपशीलवार अटी व शर्ती पाहण्यासाठी तसेच कोरी निविदा फॉर्म डाऊनलोड करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या ई-निविदा पोर्टल https://mahatenders.gov.in आणि www.mahammb.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०६.०७.२०२३ रोजी १७.०० वा. पासून उपलब्ध होतील.

कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीकार यांचेकडे राखून ठेवण्यात आला आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई

नि व ड क

जिल्ह्यात ३१.८ मि.मी.

अलिबाग : जिल्ह्यात गेल्या २४ तासात ३१.८ मि.मी पावसाची नोंद झाली आहे. अलिबाग-५६.०० मि.मी., पनवेल-३८.०० मि.मी.,कर्जत-१६.४ मि.मी., खालापूर-२१.००, उरण-३३.०० मि.मी., सुधागड-१२.०० मि.मी., पेण-५०.०० मि.मी., महाड-२३.०० मि.मी. माणगाव- ३३.०० मि.मी., रोहा- १९.०० मि.मी., पोलादपूर- ७.०० मि.मी, मुरुड- ५६.०० मि.मी., श्रीवर्धन- ४१.०० मि.मी., म्हसळा-२२.०० मि.मी., तळा- १३.०० मि.मी.

बेरोजगारांची फसवणूक

नवी मुंबई : रिलायन्स जिओ कंपनीमध्ये विविध पदांवर नोकरी मिळवून देण्याचे प्रलोभन दाखवून बेरोजगार तरुणांकडून लाखो रुपये उकळल्याचे उघडकीस आले आहे. विशेष म्हणजे सायबर चोरांच्या या टोळीने एका नामांकित कंपनीचा लोगो तसेच बनावट ट्रेडमार्कचा वापर करून खोटी पत्रे ई-मेलद्वारे पाठवल्याचे उघडकीस आले आहे.रिलायन्स जिओ कंपनीमध्ये नोकरी मिळवून देण्याचे प्रलोभन दाखवून बेरोजगारांकडून पैसे उकळण्यात आले आहेत.

वसतिगृहात मोफत प्रवेश

अलिबाग : सामाजिक न्याय विभागांतर्गत मागासवर्गीय विद्यार्थींनीकरिता मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागास मुलींचे शासकीय वसतिगृह गोंधळपाडा अलिबाग येथे कार्यरत आहे. या वसतिगृहात सन २०२३-२०२४ या शैक्षणिक वर्षाकरिता वसतिगृह प्रवेश अर्ज हे ऑफलाईन भरण्याकरिता कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे शासकीय वसतिगृहाच्या गृहपाल सु.एस. गुजेला यांनी कळविले आहे.

मोर्बा येथे वृक्षारोपण

पनवेल : अलिबाग वन विभाग, पनवेल परिक्षेत्र, मोर्बा वनपरिमंडळ मधील नियतक्षेत्र पाले बु. मध्ये वनविभाग, ग्रामपंचायत वलप आणि सेंट जोसेफ स्कुल कळंबोली व माजी सभापती काशिनाथ पाटील यांच्या संयुक्त विदयमाने मौजे वलप संरक्षित वन सं न १२ मध्ये वनमहोत्सवानिमित्त कंरज, फणस, कडुनिंब, जांभूळ, चिंच वृक्ष लावण्यात आले. यावेळी जी टी आडकर, पी एस इंडी, व्ही एस अळगी, आर एस पारधी, श्रीमती आडे उपस्थित होते.

नियमांची पायमल्ली

पनवेल : शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासासाठी शासनाने स्कूल बसबाबतचे नियम आहेत; परंतु जास्त पैसा कमावण्याच्या नादात तसेच वेळेवर शाळेत पोहोचण्यासाठी विद्यार्थ्यांची धोकादायक वाहतूक केली जात आहे. खारघर परिसरात चाळीसहून अधिक शाळा आहे; तर बहुतांश विद्यार्थी पनवेल, नवी मुंबई परिसरातील शाळेत शिक्षण घेत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात स्कूल बस धावतात. त्यामुळे नियमांची पायमल्ली करणाऱ्यांवर कारवाईची मागणी होत आहे.

दरडमुक्तीसाठी बांबू लागवड वरदान

■ जिल्हा परिषदेचा स्तुत्य उपक्रम ■ मातीची धूप थांबविण्यासाठी होणार मदत

। अलिबाग । प्रमोद जाधव ।

महाड येथील दरड दुर्घटनेनंतर जिल्हा प्रशासनाने बोध घेत दरड रोखण्यासाठी पुढाकार घेतला आहे. मातीची होणारी धूप थांबविण्यासाठी बांबूच्या झाडाचा फायदा मोठ्या प्रमाणात होतो.जिल्ह्यातील दरडग्रस्त भागात बांबूची लागवड करण्यावर जिल्हा परिषदेने भर दिला आहे. बांबूपासून रोजगार निर्मितीला चालना मिळण्याबरोबरच भुस्खलन रोखण्यासाठी बांबूचा फायदा होणार आहे, त्यामुळे बांबू लागवड दरडमुक्तीसाठी एक वरदान ठरणार असल्याचे चित्र समोर येत आहे.

मागच्या वर्षी झालेल्या अतिवृष्टीमध्ये जिल्ह्यातील अनेक भागात पुरपरिस्थिती निर्माण झाली होती. पोलादपूर, कर्जत तालुक्यासह महाडमध्ये दरड कोसळली होती. डोंगरभागातील अनेक झाडे, दगड, मातीने गावेच्या गावे उद्ध्वस्त केली. महाड येथील दुर्घटनेनंतर जिल्हा परिषद, जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेत दरड रोखण्यासाठी बांबू लागवड केली. येथील डोंगरभागात सुमारे दोन लाख बांबूच्या रोपांची लागवड केली. बांबूचे मुळ माती धरून ठेवतात. मातीची होणारी धूप थांबविण्यास बांबूची मोठ्या प्रमाणात मदत होते. हे लक्षात आल्यावर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी पुढाकार घेत जिल्ह्यातील गावे, वाड्यांच्या भागात बांबुची लागवड करण्यासाठी प्रयत्न सुरु केले आहेत.

बांबू लागवडीसाठी तालुका, ग्रामपंचायत स्तरावर स्वयंसेवी संस्था, स्वदेश फाऊंडेशन, रोटरी क्लब, लायन्स क्लब, स्थानिक स्वराज्य संस्थेतील लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, स्वयंसेवक, स्वयंसहाय्यता बचत गटातील महिला, गावातील महिला मंडळे, भजनी मंडळे व युवक यांचा लोकसहभाग घेतला जाणार आहे. जिल्ह्यात सुमारे सात लाखापेक्षा अधिक बांबूची बेटे तयार केली जाणार आहेत.

व्यवसाय वृध्दीला मिळणार चालना

रायगड ग्रामीण जिल्हा असल्याने जिल्ह्यात आजही बांबूपासून तयार होणाऱ्या उपकरणांना पसंती दर्शविली जाते. टोपली, सुप, झोपाळा, बांधकाम व्यवसाय, खुर्ची, आराम खुर्ची, डायनिंग सेट, सोफा सेट, टी पॉय, शो पीस, वॉटर फॉल, विद्यूत दिवे, बेड, ट्रॉली, परडी अशा अनेक प्रकारचे फर्निचर बनविण्याचे काम बांबूपासून केले जाते. वेगवेगळ्या ठिकाणी बांबूच्या गॅलरी उभ्या होऊ लागल्या आहेत. त्यामुळे जिल्ह्यात बांबुला महत्व प्राप्त झाले आहे. जिल्ह्यामध्ये बांबू लागवडीमुळे व्यवसाय वृध्दीला चालना मिळण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

> बांबू साधारणतः ३५ ते ४० वर्षाचे आहेत. बांबूची लागवड केल्यावर तीन ते चार वर्षात उत्पादन मिळण्यास सुरुवात होते. हे उत्पादन सुमारे ३५ वर्षे मिळते. जिल्ह्यात पाऊस भरपूर पडतो. दरड कोसळण्याची अधिक भीती आहे. त्यामुळे दरड रोखण्यासाठी बांबू वितरण करण्याचे काम केले जात आहे.
> नरेंद्र पाटील- वनपरिक्षेत्र अधिकारी, अलिबाग

> दरड रोखण्यासाठी बांबूची लागवड महत्वाची आहे. जिल्ह्यात ग्रामपंचायत स्तरावर बांबूची लागवड करण्यासाठी वन विभाग व सामाजिक वनीकरण विभागाकडून मागणी करण्याची सुचना केली आहे. त्याची अंमलबजावणी सुरु झाली आहे. बांबू लागवडीतून रोजगाराचे साधनही खुले होणार आहे.
> - डॉ. किरण पाटील
> मुख्य कार्यकारी अधिकारी
> रायगड जिल्हा परिषद

अपूर्ण रस्त्यामुळे नागरिकांना त्रास

। श्रीवर्धन । वार्ताहर ।

श्रीवर्धन नगरपरिषदेने जलशुद्धीकरण प्रकल्प व शहरातील जलवाहिन्या बदलण्याच्या कामाची निविदा काढली होती. गेल्या वर्षी पावसाळ्या अगोदर जलशुद्धीकरण प्रकल्पाचे व जलवाहिन्या बदलण्याचे काम सुरू करण्यात आले होते. पावसाळ्याअगोदर रानवली तलाव ते आराठी या ठिकाणापर्यंत नवीन जलवाहिन्या टाकून झाल्या होत्या. यावर्षी पावसाळा संपल्यानंतर श्रीवर्धन शहरातील जलवाहिन्या बदलण्याचे काम हाती घेण्यात आले. संबंधित ठेकेदाराने जलवाहिन्या बदलण्याचे काम जवळजवळ पूर्ण केले असून जलवाहिन्या बदललेल्या ठिकाणी खोदकाम केल्यामुळे त्या ठिकाणचे डांबरीकरण राहून गेले आहे. सदर ठेकेदाराने अनेक ठिकाणी रस्त्यावर खडी पसरलेली असून या खडीवरून अनेक दुचाकीस्वार पडलेले आहेत.

सदर पसरलेल्या खडीवरती रोलर फिरवलेला नसल्यामुळे अनेक अवजड वाहने त्या ठिकाणी खचलेली पाहायला मिळतात. ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे काम रखडलेले असून शहरातील नागरिकांना विनाकारण मनस्ताप सहन करावा लागत आहे. त्यामुळे संबंधित ठेकेदाराने त्या ठिकाणी रोलर फिरवून रस्ता करावा, अशी मागणी शहरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

पोयनाड हायस्कूलमध्ये वृक्षारोपण

। पेझारी । वार्ताहर ।

को.ए.सो.ना.ना. पाटील हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय पोयनाड येथे को.ए.सो.चे ज्येष्ठ संचालक माजी आ. पंडित पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रम प्रसंगी त्यांनी वाढलेले प्रदूषण, वाढलेल्या पर्यावरणीय समस्या कमी करण्यासाठी शालेय स्तरावर प्रयत्न होणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

यासाठी शाळांनी एक विद्यार्थी - एक झाड तर नागरिकांनी एक व्यक्ती-एक झाड हा उपक्रम राबविणे गरजेचे आहे असे आवाहन याप्रसंगी केले.

याप्रसंगी शाळा समिती सदस्य यशवंत पाटील, संदीप पाटील, शाळेचे माजी प्राचार्य हळदवणेकर, रणदिवे, कुलकर्णी, फडतरे, प्राचार्य शशिकांत पाटील, सत्र प्रमुख तृप्ती पिळवणकर, उदय पाटील आरएसपी व एनसीसीचे मार्गदर्शक समाधान भंडारे, संजय डोंगरे, देवेंद्र पाटील, अविनाश पाटील तसेच सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, एनसीसी, आरएसपी विद्यार्थी पथके या सर्वांनी वृक्षारोपणात सहभाग नोंदविला. सायली पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले.

भात लावणी

● मुरूड खारआंबोली व तेलवाडे परिसरात सुरवातीच्या पाऊसात लावलेले राब चांगले झाल्याने भात लावणी जोरात सुरू आहे. पाऊस सतत पडत असल्याने यंदा भात चांगले होईल अशी आशा आहे. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

श्रीवर्धन बाजारपेठेत वाहतूक कोंडी

। श्रीवर्धन। वार्ताहर ।

श्रीवर्धन शहर अंदाजे साडेतीनशे वर्षांपूर्वी वसविले आहे, त्यावेळच्या लोकसंख्येच्या प्रमाणात या ठिकाणाचे रस्ते बनवण्यात आले होते.

रस्त्यावरून दोन बैलगाड्या जातील तेवढ्याच रुंदीचा रस्ता या ठिकाणी बनवलेला आहे. या ठिकाणाची नगरपरिषद देखील ब्रिटिश कालीन आहे. परंतु रस्त्यांची अवस्था आहे तशीच आहे. दिवसेंदिवस वाढणारी लोकसंख्या व शहरीकरणामुळे वाहतूक कोंडी नित्याची झाली आहे. त्यातच बाजारपेठेतील अरुंद रस्त्याच्या दोन्ही बाजूला दुचाकीस्वार दुचाकी उभ्या करून

दुकानांमध्ये खरेदी करत असल्याने बाजारपेठेत वाहतूक कोंडी होत असते. वाहतूक कोंडीमुळे महिलांना व ज्येष्ठ नागरिकांना बाजारपेठेतून चालणे देखील मुश्किलीचे होऊन जाते.

श्रीवर्धन शहरासाठी केवळ एकाच वाहतूक पोलिसाची नियुक्ती असल्याने सदर पोलीस कोणकोणत्या ठिकाणी लक्ष देईल? हा देखील कुतूहलाचा विषय बनला आहे. या दुचाकीस्वारांवर पोलिसांनी दंडात्मक कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

रूपाली सपकाळची पीएसआयपदी निवड

। उरण । वार्ताहर ।

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयाची रूपाली सोनू सपकाळ या विद्यार्थिनीची एमपीएससी द्वारे झालेल्या परीक्षेतून पीएसआय पदी निवड झाली आहे. विशेष म्हणजे महिला प्रवर्गातून ती महाराष्ट्र राज्यात प्रथम आली आहे. उरण महाविद्यालयाची इतिहास विषयाची पदवीधर विद्यार्थिनी आहे. तिच्या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. बळीराम एन. गायकवाड, के. ए. शामा, डॉ. ए. आर चव्हाण, डॉ. एम. जी लोणे, डॉ. दत्ता हिंगमिरे, टी. एन घ्यार व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तिला शुभेच्छा दिल्या.

रायगडमध्ये महावितरण सज्ज

। अलिबाग । प्रतिनिधी ।

यंदा नैसर्गिक आपत्तीशी सामना करण्यासाठी महावितरण विभाग सज्ज असल्याचे चित्र आहे. दीड हजार कर्मचाऱ्यांसह लागणारी साहित्यांचा पुरवठा महावितरण विभागाने ठेवला असून २४ तास नियंत्रण कक्ष स्थापन केले आहे. यातून आपत्कालीन परिस्थितीशी सामना महावितरण विभाग करणार असल्याची माहिती अधीक्षक अभियंता ए. आय मुलाणी यांनी दिली.

तीन जून २०२० मध्ये झालेल्या निसर्ग चक्रीवादळामध्ये महावितरणचे प्रचंड नुकसान झाले. वीजतारांसह,विजेचेखांब,रोहित्राचे खुप नुकसान झाले. दोन ते तीन महिने अनेक गावे अंधारात होती. रायगड जिल्ह्यातील महावितरण विभागासह अन्य जिल्ह्यातील महावितरण विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांची मदत घेत विज सेवा पुर्ववत करण्याचा प्रयत्न केला. या घटनेनंतर बोध घेत महावितरण विभागाने आपत्कालीन परिस्थितीशी सामना करण्यासाठी सुविधा उपलब्ध केल्या आहेत. रायगड जिल्ह्यात महावितरण विभागाचे मध्यवर्ती कार्यालय पेण येथे असून या कार्यालयाच्या अखत्यारित चार उपविभागांचा समावेश आहे. महावितरण कंपनीच्या अखरत्यारित असलेल्या कार्यालयांमध्ये एकूण एक हजार ३५० कर्मचारी आहेत. त्यात कंपनीचे ६०० व बाह्यस्त्रोतमध्ये काम करणारे ७५० कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. नेमण्यात आलेल्या ३५ एजन्सीद्वारे ३५० मनुष्यबळ, ४० वाहने उपलब्ध करण्यात आले आहेत. तसेच पुरपरिस्थितीच्या काळात मालाची व मनुष्यबळाची ने-आण करण्यासाठी प्रत्येक उपविभागात दोन बोटी अशा एकूण ८ रबरी बोटी आहेत. झाडे तोडण्यासाठी ४० कटर आहेत. रात्रीच्या वेळी काम करण्यासाठी बॅटरी, रेनकोट, गमबुट असणार आहे. त्यापध्दतीने उपकरणांचा साठा सुविधा उपलब्ध केला आहे. रोहित्र अथवा अवजड उपकरण उचलण्यासाठी साखळी युक्त यंत्रदेखील ठेवण्यात आले आहे.

तसेच मध्यवर्ती कार्यालयासह अन्य उपविभागाच्या कार्यालयात नियंत्रण कक्ष तैनात करण्यात आले आहेत. या ठिकाणी २४ तास सेवा उपलब्ध असणार आहे. पावसाळ्यात आपत्तीशी सामना करण्यासाठी महावितरण विभाग सज्ज असल्याची माहिती अधीक्षक अभियंता मुलाणी यांनी दिली.

शाळा वाचविण्यासाठी शिवराज्य संघटनेचा पुढाकार

। पाली/बेणसे । वार्ताहर ।

शिवराज्य प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य आयोजित शाळा वाचवा अभियान अंतर्गत शिक्षण हक्क परिषद खोपोली येथे खालापूर तालुका रायगड जिल्ह्यामध्ये संपन्न झाली. या शिक्षण हक्क परिषदेचा मुख्य हेतू वीस पटसंख्या अभावी शासनाने शाळा समायोजित करण्याचा अर्थात बंद करण्याचा निर्णय घेण्याचे नवीन शैक्षणिक धोरणामध्ये निदर्शनास आले आणि या धोरणाच्या विरुद्ध संपूर्ण महाराष्ट्रात शिक्षण हक्क परिषदांच्या आयोजन केले गेले आहे. शाळा वाचवा या विषयावर ठराव घेतला जात असून ठरावाला एक मताने मंजुरी देऊन हे सर्व ठराव महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व शिक्षणमंत्री यांना जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत ३ जुलै कार्यालय देण्यात आले.

जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेमध्ये इंग्लिश मीडियम सक्तीचे करण्यात यावे, पहिली ते आठवीपर्यंत ढकलपास किंवा एक विद्यार्थ्याला पुन्हा त्याच वर्गात बसविण्याचे संधी न देणे हा निर्णय बंद करून सक्तीचे परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवणे, शिक्षणाचे खाजगीकरण रद्द करून राष्ट्रीयकरण करणे, केंद्र व राज्य सरकारने आपल्या उत्पन्नाच्या १० टक्के खर्च शिक्षणावर करणे, शासनाने केजी टू पीजी प्राथमिक शिक्षण ते उच्च माध्यमिक पर्यंतचे शिक्षण मोफत व सक्तीचे आणि दर्जेदार उपलब्ध करून देणे, गाव वाडी वस्ती पाडा येथील स्थानिक स्वराज्य संस्था शैक्षणिकदृष्ट्या दर्जेदार ठेवण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने सर्वतपरी परिणामकारक प्रयत्न करणे, स्थानिक स्वराज्य संस्थेतील शिक्षकांना शालेय कामकाजा व्यतिरिक्त अन्य कोणतीही कामे शासनाने देऊ नये, कायम विनाअनुदानित शाळा या अनुदानित करण्यात याव्या अशा मागण्या शिवराज्य प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य संस्थेच्या वतीने करण्यात आल्या. यावेळी ॲड. रोशन पाटील, विकी कदम, अनिल सानप, आकाश पाटील, तेजस पाटील, सभासद सुरज कदम उपस्थित होते.

महानगर गॅस लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: एमजीएल हाऊस, जी-33 ब्लॉक, वान्द्रे-कुर्ला संकुल, वान्द्रे (पूर्व), मुंबई 400051 • CIN: L40200MH1995PLC088133
दूरध्वनी: +91 22 26540092 / 1046 • **ई-मेल:** info@mahanagargas.com • **संकेतस्थळ:** www.mahanagargas.com

MAHANAGAR GAS

उसर / थल जवळ मोकळ्या प्लॉटची आवश्यकता

महानगर गॅस लिमिटेडला पुढील तपशिलांनुसार थेट विक्री तत्त्वावर उसर (रायगड जिल्हा) किंवा में. आरसीएफ, थल (रायगड जिल्हा) जवळ एक मोकळा प्लॉट हवा आहे:

स्थळ	किमान प्लॉटचे माप	रस्त्याचा पट्टा (दोन्ही बाजूंना)	जवळपासचे ठिकाण	प्रस्तावाचा अंतिम दिनांक आणि सुपूर्द करण्याचा पत्ता
अलिबाग – रोहा रोड	5000 चौ. मी.*	अंदाजे 3.5 किमी गेलच्या खानाव एसव्ही (उसर) पासून वावे गावापर्यंत (रोह्याकडे) आणि अंदाजे 5 किमी गेलच्या खानाव एसव्ही (उसर) पासून सहान गावापर्यंत (अलिबागच्या दिशेने)	मे. गेल, उसरचे पेट्रोकेमिकल कॉम्प्लेक्स	**दिनांक 28.07.2023 रोजी सायं. 17.00** वाजण्यापूर्वी पुढील पत्त्यावर महानगर गॅस लिमिटेड, 10वा मजला, झिऑन बिल्डिंग, प्लॉट नं. 273, सेक्टर 10, खारघर, नवी मुंबई – 410210, महाराष्ट्र
अलिबाग – रेवस रोड	5000 चौ. मी.*	आरसीएफ थल मुख्यद्वारापासून सुमारे 5 किमी रेवासच्या दिशेने आणि आरसीएफ थल मुख्यद्वारापासून सुमारे 5 किमी अलिबागच्या दिशेने	मे. आरसीएफ, थलचे मुख्यद्वार	

*वर नमूद केलेले क्षेत्र हे सरकार / महामार्ग / स्थानिक प्राधिकरणांच्या प्रचलित नियम / नियमांनुसार लागू होणारे आघात क्षेत्र वगळून आहे.

इच्छुक पक्षांकडून (व्यक्ती / जमीनमालक / मुखत्यारनामा धारक / मालमत्ता मालकांद्वारे अधिकृत एजंट) स्पष्ट आणि निर्विवाद मोकळ्या प्लॉटसाठी प्रस्ताव मागविण्यात येत आहेत ज्यांचे अधिमापन उपरोक्त मापाचे असून पुढचा भाग रस्त्याला लागून किमान 50 मीटर्सचा आहे. प्रस्तावित प्लॉटवरून किंवा खालून कोणतीही हाय व्होल्टेज लाइन किंवा कोणतीही पाइपलाइन जाऊ नये. **प्रस्ताव दोन बोली यंत्रणेअंतर्गत सीलबंद लिफाफ्यांमध्ये 28.07.2023 पर्यंत पाठवावेत. 1ल्या लिफाफ्यावर तांत्रिक लिफाफा (अलिबाग–रोहा मार्गावरील प्लॉट किंवा अलिबाग–रेवस मार्गावरील प्लॉट** जसे असेल तसे) **असे लिहिलेले असावे,** आणि त्यामध्ये स्थळाचे तपशील, मालकीचे तपशील, ड्रॉइंग्ज, मुख्य योजना ज्यामध्ये मालमत्तेचे तपशील, प्लॉटची स्थळ तपशीलासह सर्व बाजूंना लागून असलेल्या प्लॉट्सचे प्लॉट क्रमांक, विक्रीसाठी प्रस्तावित क्षेत्र, प्लॉटची परिमाणे, '7/12' उतारा किंवा तत्सम, एजंट / मुखत्यारधारक असल्यास मुखत्यारनामा आणि **दर वगळता** इतर सर्व नियम व अटी असाव्यात. **2ऱ्या लिफाफ्यावर किंमत लिफाफा (अलिबाग–रोहा मार्गावरील प्लॉट किंवा अलिबाग–रेवस मार्गावरील प्लॉट** जसे असेल तसे) **असे लिहिलेले असावे,** आणि त्यामध्ये एकक दर / चौरस मीटर / एकूण रक्कम असावी. हे दोन्ही लिफाफे एका मोठ्या लिफाफ्यामधे घालून त्यावर **"एमजीएलसाठी प्लॉट (अलिबाग–रोहा मार्गावरील प्लॉट किंवा अलिबाग–रेवस मार्गावरील प्लॉट) – उघडू नका"** असे लिहिलेले असावे आणि तो सीलबंद करून उपाध्यक्ष (प्रकल्प), महानगर गॅस लिमिटेड ह्यांना उपरोक्त पत्ता झिऑन, खारघर वर **28.07.2023** रोजी सायं. **17.00** वाजेपूर्वी पाठवावा.

तपशीलवार नियम व अटींसाठी, ज्यामध्ये प्रस्ताव सादर करण्यासाठी मार्गदर्शिका आणि स्थळांचे निर्देशक योजनाबद्ध नकाशे समाविष्ट आहेत, कृपया आमच्या वेबसाइटला भेट द्या: **www.mahanagargas.com**. जर कोणतेही प्रश्न असतील, तर ते कृपया **info@mahanagargas.com** येथे ईमेल करा व विषय लिहा **"उसर / थल जवळ मोकळ्या प्लॉटची आवश्यकता".**

पवारांचा धोबीघाट

राष्ट्रवादी काँग्रेसमधील शक्तिप्रदर्शनांमध्ये परस्परांवर टीका करताना कोण कोणत्या थराला जाणार हेच सर्वात औत्सुक्याचे होते. त्यानुसार, अजितदादांनी इतक्या वर्षात आपल्यावर झालेला कथित अपमान आणि इतर गोष्टींबाबत साठलेली मळमळ बाहेर काढली. शरद पवार हे आपले दैवत व गुरु आहेत असे पुन्हा पुन्हा सांगत त्यांनी काकांची प्रतिमा छिन्नविच्छिन्न करण्याचा प्रयत्न केला. इतकी वर्षे दुटप्पी आणि निसरड्या भूमिका घेणे, सहकाऱ्यांचा विश्वासघात करणे याबाबत पत्रकार व विरोधक शरद पवारांवर टीका करीत आले. अजिबात विश्वासार्ह नसलेले राजकारणी असे बिरुद त्यातूनच त्यांना चिकटले. आज, एकेकाळी त्यांचा वारसदार समजल्या जाणाऱ्या, पुतण्यानेच त्याचे पुरावे दिले. भाजपसोबत युती करण्यासाठी राष्ट्रवादीच्या कशा बैठका झाल्या होत्या याची ठोस उदाहरणे सांगितली. दुसरीकडे प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ आणि धनंजय मुंडे यांनी आडून आडून बरेच वार केले. कालपर्यंत सावलीसारखे वावरणाऱ्या या सहकाऱ्यांचे हे आरोप खोडून काढणे शरद पवार यांना सोपे जाणार नाही. शरद पवार यांनी आपल्या मेळाव्यात अजितदादा आणि प्रफुल्ल पटेल यांच्या टीकेबाबत पूर्ण मौन पाळणे हे अनेक अर्थांनी सूचक होते. मात्र त्यांनी भुजबळांना मुख्य लक्ष्य बनवले. आपल्या गटात नेमके किती आमदार याचा त्यांनी कोणताही दावा केला नाही. शिवाय, उद्या कदाचित पक्षाचे चिन्हही गमवावे लागू शकते असे सूचित केले. एकूण आजच्या दोन्ही मेळाव्यांनंतर शरद पवार गटाची आगामी वाटचाल बरीच खडतर असेल, हे स्पष्ट झाले. ८३ वर्षांच्या धुरंधर पवारांनी आपल्या भाषणाची अखेर, अरे पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली असे म्हणून करणे हे धीरोदात्त व त्यांच्या कार्यकर्त्यांना बळ देणारे असले तरी परिस्थिती अत्यंत गंभीर आहे हे बजावणारेही होते.

गुगलीची परतफेड

बुधवारच्या शक्तिप्रदर्शनामध्ये अजितदादांचा गट भारी ठरणार हे गेल्या दोन दिवसांमध्ये स्पष्ट झालं होतंच. अजित पवार व सहकाऱ्यांनी बाहेर कोणतीही चर्चा न करता थेट मंत्रिपदाची शपथ घेतली होती. त्याअर्थी त्यांच्या मागे बहुसंख्य आमदार असल्याचा काही ना काही ठोस पुरावा असणार हे अपेक्षितच होते. आजतागायत ही संख्या नेमकी किती हे त्यांनी सांगितलेले नाही. मात्र संघटनेवरची त्यांची पकड आणि आता मिळालेली सत्ता लक्षात घेता आमदार त्यांच्या बाजूला झुकणार हे उघड होतं. तेच झालं आहे. शरद पवारांना सोडून भाजपशी जुळवून घेण्याचं समर्थन दादा गट कशा रीतीने करतो हाच कळीचा मुद्दा होता. उद्या महाराष्ट्रात लोकांपर्यंत जाताना आमदारांना व इतर कार्यकर्त्यांनाही याच प्रश्नाचं उत्तर द्यावं लागणार आहे. त्यामुळे दादांनी त्याचा निःसंदिग्ध खुलासा करणं अपेक्षित होतं व त्यांनीही ते जोरदारपणे केलं. शरद पवार यांचं नाव न घेता त्यांनी त्यांच्या आजवरच्या राजकीय प्रवासात किती वेळा भूमिका बदलल्या याचा पाढा वाचला. पुलोद स्थापना, राजीव काँग्रेसमध्ये फेरप्रवेश, सोनियांच्या इटालियन असण्याचा मुद्दा करून राष्ट्रवादीची स्थापना इत्यादींची उदाहरणे देऊन त्यांनी पवार यांनी आपल्या मनाला येईल त्याप्रमाणे धोरणे आखली व कार्यकर्ते त्यांच्यामागे जात राहिले असे सांगितले. २००४ च्या निवडणुकीत विधानसभेमध्ये सर्वाधिक जागा मिळूनही राष्ट्रवादीने मुख्यमंत्रिपद न घेण्यात आपल्याला डावलण्याचा हेतूच होता असा अप्रत्यक्ष आरोप त्यांनी केला. भाजपसोबत जाण्यासाठी काकांनी २०१७ व २०१९ मध्ये तयारी केली होती आणि नंतर त्यांनी मला तोंडघशी पाडले असे दादांचे म्हणणे आहे. यासाठीच्या बैठका उद्योगपतींच्या मध्यस्थीने झाल्या होत्या हे सांगणे म्हणजे तर काकांना गर्भित इशाराच म्हणायला हवा. यामुळे आजवरच्या कुजबुजीला आता थेट प्रत्यक्षदर्शीचा दुजोरा मिळाला आहे. अलिकडेच पहाटेच्या शपथविधीचा वाद उफाळून आला होता. त्यावेळी आपण टाकलेल्या गुगलीवर देवेंद्र फडणवीस यांनी विकेट दिली होती अशी शेखी शरद पवार यांनी मिरवली होती. आज मोदी आणि शाह यांनी अजितदादांकरवी त्याची परतफेड केली आहे.

भाजपचाच फायदा

भाजपचे हिंदुत्व अधिकाधिक कडवे आणि मोदींचे सरकार अधिकाधिक हुकुमशाही होत चालले आहे. विरोधक व माध्यमे यांच्या मुसक्या आवळल्या जात आहेत. अशा पक्ष व राजवटीसोबत आपण का गेलो याचे जनतेला पटेल असे समर्थन देणे हे अजितदादा आणि मंडळींसोबतच मोठे आव्हान आहे. शरद पवार हे संख्येच्या व ताकदीच्या दृष्टीने दुबळे असले तरी या मुद्द्याच्या आधारे दादांच्या गटाविरुध्द रान उठवणार हे उघड आहे. शरद पवार यांची लोकप्रियता आणि राज्यातले सर्वसाधारण वातावरण लक्षात घेता दादांना हा मुद्दा जड जाईल हे नक्की. त्याचा प्रतिवाद करण्यासाठी खुद्द शरद पवार हेच कसे भाजपसोबत जायला अनुकूल होते हे ते सांगणार हे तसे अपेक्षितच होते. या निमित्ताने पवारांची विश्वासार्हता नष्ट करणे व पवारांचा आपल्याला छुपा पाठिंबा आहे असे सूचित करणे असे दुहेरी डावपेच दादा गट खेळेल हे आज स्पष्ट झाले. पवारांना याचा अंदाज असेलच. कसलेल्या पहिलवानाप्रमाणे त्यांच्याकडे याला काहीतरी तोड असेलच. कदाचित पूर्वीच्या तपशीलात न जाता भाजपच्या हिंदुत्ववादावर अधिकाधिक प्रखर टीका करणे हे त्याचे उत्तर असू शकेल. आजच्या भाषणात त्यांनी तेच केले. शिवसेनेच्या व भाजपच्या हिंदुत्वात फरक आहे असे ते म्हणाले. भाजपचा समाजात द्वेष पसरवण्याचा व दुही माजवण्याचा उद्योग याबाबत त्यांनी स्पष्ट भूमिका घेतली. ती अधिक प्रखर होत जाईल असे दिसते. तसे झाले व लोकांनी ती उचलून धरली तर भूतकाळाला धरून केलेल्या दादांच्या वैयक्तिक आरोपांना फारसा अर्थ उरणार नाही. दादांनी काकांना आता निवृत्त व्हा असं थेट सांगणं हेही सर्वांना मानवेल असे नाही. आपल्यावर अन्याय झाला आहे असे म्हणण्याचा दादांना कितपत अधिकार आहे हाही प्रश्नच आहे. अंतिमतः, या भांडणातले तत्वाचे मुद्दे संपून हा पवारांच्या घरातला धोबीघाट झाला तर त्यात फक्त आणि फक्त भाजपचाच फायदा आहे.

विचार

छत्तीसगडमध्ये पक्षांतर्गत सुंदोपसुंदी

लोकसभा निवडणुकीअगोदर विधानसभा निवडणुकीला यंदा सामोरे जाणाऱ्या पाच राज्यांमध्ये छत्तीसगडचा समावेश आहे. एकीकडे काँग्रेसने विधानसभेबरोबरच लोकसभा निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. दुसरीकडे भाजपने साम, दाम, भेद, दंड नीती वापरून राज्य ताब्यात घेण्याचे ठरवले आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी स्वतः या राज्यात लक्ष घातले आहे. त्याच वेळी काँग्रेसमध्येही सुंदोपसुंदी सुरू झाली आहे.

अजय तिवारी

छत्तीसगडमध्ये यंदा विधानसभा निवडणुका होणार आहेत. त्यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी तयारी सुरू केली आहे. काँग्रेसनेही त्या दृष्टीने तयारी सुरू केली आहे. सत्ताधारी पक्ष असल्याने काँग्रेसचा प्रचारही जोरात सुरू आहे. काँग्रेस पक्षाची तयारी केवळ विधानसभा निवडणुकीसाठी सुरू नाही, तर आगामी लोकसभा निवडणुकीसाठीही पक्षाने उमेदवार शोधण्यास सुरुवात केली आहे. काँग्रेसचे दहा हजार कार्यकर्ते प्रत्यक्ष मैदानात उतरणार आहेत. महिनाभरात काँग्रेसने विभागीय बैठकांपासून बूथपर्यंत पोहोचण्याचे लक्ष्य ठेवले आहे. राज्यातल्या पाच प्रमुख विभागांमध्ये बैठका घेतल्या. यानंतर विधानसभा स्तरावर प्रशिक्षण आयोजन करण्यात आले आहे. भाजपने जसे बूथ लक्ष केंद्रीत करून नियोजन केले आहे, तसेच काँग्रेसनेही 'बूथ चलो' अभियान सुरू केले आहे. प्रत्येक विधानसभा मतदारसंघात मंत्री संपर्क साधणार आहेत. राज्यात २३ हजार बूथ आहेत. तिथे काँग्रेसने संघटनात्मक काम सुरू केले आहे. काँग्रेस येत्या काही दिवसांमध्ये २३ हजार बूथपर्यंत पोहोचणार आहे. या वर्षाच्या अखेरीस म्हणजे नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. यानंतर २०२४ मध्ये देशात लोकसभेच्या निवडणुका होणार आहेत. त्यामुळे विधानसभा निवडणुकीसोबतच काँग्रेस राज्यातील लोकसभेच्या ११ जागांसाठीही रणनीती बनवत आहे. याबाबत पक्षाचे प्रदेशाध्यक्ष मोहन मारकाम यांनी विधानसभेसोबतच लोकसभेची तयारी सुरू केली आहे, असे सांगितले.

एकीकडे ही स्थिती असताना दुसरीकडे भाजपनेही विधानसभा आणि लोकसभेची तयारी सुरू केली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी छत्तीसगडवर लक्ष केंद्रीत केले आहे. छत्तीसगडमधील दुर्ग येथील रविशंकर स्टेडियममध्ये त्यांनी मोठी जाहीर सभा घेऊन प्रचारही सुरू केला. त्यांनी मुख्यमंत्री भूपेश बघेल यांना 'तुमची उलटी गणती सुरू झाली आहे' अशा भाषेत बजावत राज्यात भाजपचे सरकार येणार असल्याचे सांगितले. सभेतील लोकांना विचारून त्यांनी देशात आणि राज्यातही भाजपचे सरकार येणार असल्याचे सांगितले. छत्तीसगड सरकार हे आश्वासने मोडणारे सरकार आहे. त्यांनी दारूबंदीची चर्चा केली; पण प्रत्यक्षात केली नाही. दहा वर्षात काँग्रेसने १२ लाख कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केला, असा आरोप करताना भाजपने गेल्या नऊ वर्षांमध्ये केलेल्या कामांचा आढावा घेतला. मोदी यांनी आपल्या नऊ वर्षांच्या कारकीर्दीत इतके पारदर्शक सरकार चालवले की विरोधकांनाही भ्रष्टाचाराचा आरोप करता आला नाही, असे ते म्हणाले.

काँग्रेस सरकारने दारू घोटाळा, कोळसा घोटाळा, गोठा घोटाळा केला. छत्तीसगडमध्ये एक हजाराहून अधिक शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या; बलात्काराचे पाच हजारांहून अधिक गुन्हे दाखल झाले. छत्तीसगडमध्ये धान खरेदीसाठी मोदी सरकारने नव्वद टक्के रक्कम दिली आहे. धान खरेदीची व्यवस्था माजी मुख्यमंत्री डॉ.रमण सिंग यांनी केली होती, असे शहा यांनी निदर्शनास आणले. त्यांनी पांडवानी गायिका उषा बरले यांच्या निवासस्थानी भेट दिली. एकीकडे त्यांनी वेगवेगळ्या समाजघटकांशी संपर्क साधला असताना दुसरीकडे काँग्रेसमध्ये मात्र वाद उफाळून आला. पक्षाचे प्रभारी आणि राज्याच्या प्रदेशाध्यक्षांमध्ये सर्वच ठिकाणी जसा वाद सुरू असतो, तसाच छत्तीसगडमध्येही झाला. त्याची मोठ्या प्रमाणात जाहीर वाच्यता झाली. निर्णयांना आव्हान दिले गेले. छत्तीसगड प्रदेश काँग्रेस समितीच्या काही सदस्यांना नवीन जबाबदारी देण्याबाबत प्रदेशाध्यक्ष मोहन मारकम यांनी आदेश दिल्यानंतर राज्याच्या प्रभारी कुमारी सेलजा यांनी हा आदेश रद्द केला. राज्यातील संघटना आणि पक्षश्रेष्ठींच्या प्रतिनिधींमधील अंतर वाढत आहे. दरम्यान, प्रदेश काँग्रेस कमिटी पक्षश्रेष्ठींच्या सूचनांचे पालन करेल, असे मारकाम यांनी स्पष्ट केले. तथापि, सेलजा यांच्या सूचनेनुसार काँग्रेस नेते रवी घोष यांची प्रशासन आणि संघटना महासचिवपदी नियुक्ती करण्याबाबत कोणताही आदेश जारी करण्यात आलेला नाही.

तत्पूर्वी मारकाम यांनी राजनांदगाव येथे पत्रकारांना सांगितले की सेलजा यांनी यापूर्वी केलेल्या नियुक्त्या रद्द करण्याच्या आदेशाचा आढावा घेतला आहे. काही समस्या असल्यास आम्ही बसू, चर्चा करू आणि सोडवू. सेलजा यांचा प्रत्येक आदेश आम्हाला मान्य आहे. छत्तीसगड प्रदेश काँग्रेस समिती त्यांच्या प्रत्येक आदेशाचे आणि सूचनांचे पालन करते. काँग्रेस नेत्यांच्या म्हणण्यानुसार, प्रदेश काँग्रेस अध्यक्ष मारकाम यांनी या महिन्याच्या १६ तारखेला संघटनेत फेरबदल करण्याचे आदेश जारी केले होते. या आदेशानुसार काँग्रेस नेते अरुण सिसोदिया यांची राजनांदगाव जिल्ह्याच्या प्रभारीपदावरून बदली करण्यात आली. रवी घोष यांची बस्तर विभागाच्या प्रभारीपदी बदली करण्यात आली. रायपूर शहर युवक काँग्रेसचे प्रभारी अमरजित चावला यांची एनएसयूआयच्या उपाध्यक्षपदी, रायपूर शहराच्या प्रभारी प्रतिमा चंद्राकर यांची राजनांदगावच्या प्रभारीपदी, सरचिटणीस चंद्रशेखर शुक्ला यांची मोहलाचे प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. कोंडागावचे प्रभारी यशवर्धन राव यांची प्रशिक्षण प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. मारकम यांच्या या आदेशानंतर पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी नाराजी व्यक्त केली. मुख्यमंत्री बघेल यांनाही या नियुक्त्या मान्य नव्हत्या. त्यातून प्रदेशाध्यक्ष आणि मुख्यमंत्र्यांमध्ये समन्वय नसल्याचे स्पष्ट झाले. दोघे शह-काटशहाचे राजकारण करतात.

प्रदेशाध्यक्षांच्या आदेशानंतर प्रदेश प्रभारी कुमारी सेलजा यांनी २१ जून रोजी मोहन मारकम यांना पत्र लिहून १६ जूनचा आदेश रद्द केला. सेलजा यांनी मारकम यांना संबोधित करताना पत्रात म्हटले आहे की, छत्तीसगड प्रदेश काँग्रेस कमिटीमध्ये रवी घोष यांच्याकडे सरचिटणीस प्रभारी, प्रशासन आणि संघटना या पदाची जबाबदारी देण्यात यावी आणि या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी. मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत हा निर्णय घेण्यात आल्याचे काँग्रेसच्या सूत्रांनी सांगितले. या बैठकीत मुख्यमंत्री भूपेश बघेल, कुमारी सेलजा, मोहन मारकम यांच्यासह काही मंत्रीही उपस्थित होते. काँग्रेसमधील या निर्णयाकडे पक्षातील अंतर्गत कलह म्हणून पाहिले जात आहे. छत्तीसगड काँग्रेसमध्ये सारे काही आलबेल नाही, हे या घटनेवरून लक्षात येते. काँग्रेसच्या छत्तीसगडच्या प्रभारी कुमारी सेलजा आणि पक्षाचे प्रदेशाध्यक्ष मोहन मारकाम यांच्यात खडाजंगी झाली आहे. रवी घोष यांना सरचिटणीसपद बहाल करण्याचा सेलजा यांचा निर्णय मान्य करण्यास मारकम यांनी नकार दिल्याने हा वाद चव्हाट्यावर आला. मारकम यांनी दोघांमध्ये कोणतेही वाद नसल्याचे सांगितले होते. किंबहुना, या आदेशाचा फेरविचार करण्यात येईल, या त्यांच्या पूर्वीच्या विधानाबाबत विचारले असता ते म्हणाले की, काही समस्या असल्यास आम्ही एकत्र बोलून सोडवू. काँग्रेस पक्षात शिस्त आहे आणि सर्वजण पक्षश्रेष्ठींच्या आदेशाचे पालन करतात.

मारकम यांच्या वक्तव्यानंतर सेलजा दिल्लीला रवाना झाल्या. त्यांनी सांगितले की मारकम यांच्या वक्तव्यामुळे आपण माघारी निघालो नाही. आमच्यात वादाचा कोणताही मुद्दा नाही. स्थानिक माध्यमांनी मारकम यांचे वक्तव्य चुकीच्या पद्धतीने प्रकाशित केले. मात्र बघेल यांचे निकटवर्तीय नेतेही मारकम यांच्या वक्तव्यावर खूश नसल्याचे सूत्रांनी सांगितले. पक्षाच्या एका ज्येष्ठ नेत्याने सांगितले की, आम्ही गेल्या काही महिन्यांपासून प्रदेशाध्यक्ष बदलण्याचा मुद्दा मांडत आहोत; मात्र दिल्लीचे नेते ऐकत नाहीत. सेलजा नाराज असल्याचेही पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांचे मत आहे. बहुधा त्या या विषयावर पक्षप्रमुखांशी बोलतील. मारकम यांनी तीन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला आहे. छत्तीसगड काँग्रेसमध्ये सध्या कथित गटबाजी आणि भांडणे पाहायला मिळत आहेत. भाजप आणि आम आदमी पक्ष या प्रकरणी काँग्रेसला कोंडीत पकडण्यात प्रयत्न करत आहेत. आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. काँग्रेसमधील गदारोळाचा केंद्रीय मंत्री रेणुका सिंह यांनी खरपूस समाचार घेतला. एकंदरीत, मारकम यांच्यामुळे पक्ष संघटनेतील वाद वाढला आहे. यावरून काँग्रेसमधील गटबाजी स्पष्ट होते. विधानसभेच्या निवडणुकीत ती कितपत मारक ठरते, हे समजण्यास पाच महिने वाट पहावी लागेल.

आजकाल

'मविआ'ला न मागता दिलेला सल्ला

आनंद शितोळे

मविआ मधल्या उरलेल्या घटक पक्षांना न मागता दिलेला सल्ला.दीर्घकालीन समान कार्यक्रम आखून मविआ कायम आणि सक्रीय ठेवावी. किरकोळ कुरबुरी असतीलच पण गल्ली ते दिल्ली सगळ्या निवडणुका आघाडीने एकत्र लढवून संघाच्या विरोधात एकास एक उमेदवार द्यावा. पंचायत राज्य आणि स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये असणारी सत्ताही तेवढीच महत्वाची आणि पक्षवाढ करायला उपयुक्त असते. सत्तेच्या ढेपेला लागलेले मुंगळे ढेप बदलली किंवा संपली कि दुसरीकडे जातात. पक्षाची विचारसरणी डोक्यात शाबूत असलेले कार्यकर्ते भलेही नेते जरी पळून गेले तरी पक्षात कायम राहतात. आयात नेत्यांच्या भरवशावर राहायचे दिवस केव्हाच सरले. कार्यकर्ते उभे करून त्यातून नेतृत्व उभ केल तर टिकण्याची आशा आहे.

सरकार आणि सत्ता गेल्यावर हे गबाळ वाहून जाऊन उरलेला अस्सल पक्ष कधीही परवडला.

कोरीपाटी असलेले कार्यकर्ते नेते म्हणून उभे केले तर आणि तरच ईडी सारख्या तपास यंत्रणाच्या बुलडोझरला उत्तर देण्याची क्षमता येऊ शकेल.

एक वर्ष हातात आहे, लोकांच्या प्रश्नावर सरकारला धारेवर धरल, आपले लोककल्याणकारी निर्णय सरकारने माघारी का घेतले म्हणून जाब विचारला आणि पक्षबांधणी केली तर लोकसभा आणि विधानसभा दोन्हीमध्ये एकास एक उमेदवार देऊन यश मिळवणे अशक्य नाही.

राज्य भाजपमधल्या नव्या-जुन्या-मॉडर्न-गावठी चाणक्यांना फुकटचा पण महत्वाचा सल्ला.

महाराष्ट्रात प्रबळ विरोधी पक्ष राहिला नाही तर राज्याची वाताहत होईलच पण सत्तेच हाडूक चघळायला मिळाव म्हणून सत्तेच्या वळचणीला आलेल्या नेत्यांची अवस्था पत्रावळी सारखी होईल.

तुमच्या केंद्रातल्या दरबारात तुम्हाला किंमत आणि अब्रू आहे ती महाराष्ट्रात अजूनही प्रबळ विरोधी पक्ष आहेत म्हणून.

सेना-राष्ट्रवादी-काँग्रेस राज्यातून हद्दपार झाली आणि एकपक्षीय राजवट आणि पाशवी बहुमत आल तर तुमचे मालक तुम्हाला ढोकळ्याच्या पुड्या बांधायला सुद्धा ठेवणार नाहीत.

मल्हारबाबा होळकरांचा सल्ला नीट लक्षात ठेवावा. तुम्हाला धोत्र बडवायला सुद्धा कुणी ठेवणार नाही.

भलेही एकमेकांच्या विरोधात भांडा लढा पण ज्या राज्यासाठी आणि राज्याच्या सत्तेसाठी भांडताय ते राज्यच उरल नाही तर तुमची किंमत शून्य होईल निदान याचा तरी विचार करा.

राज्याचे तुकडे झाले, राज्याची अधोगती झाली तर त्या पापाचे भागीदार सगळेच असतील.

राज्यातल्या सर्वपक्षीय नेत्यांनी हे नीट लक्षात ठेवाव.

अर्थात या साध्या बाबी मोठमोठ्या राजकारणी लोकांना नक्कीच कळत असतील पण वळत नसतील तर सांगण्याच काम आहे म्हणून सांगायच्या.

निवडणूक ओळखपत्र विकणे आहे म्हणून मिम्स आलेत. कुणी कविताही केल्यात.

अनेकांनी मताधिकार कशाला नोंदवायचा म्हणून उद्विग्नता व्यक्त केलेली आहे. राजकारणाची किळस आलीय अस वाटतय ना ? साहजिकच आहे.

पण मित्रहो ,

लोकशाहीच्या माध्यमातून सत्ता मिळवून सत्तेची कवचकुंडले सतत सोबत हवीत अस वाटणाऱ्या प्रत्येक राजकीय नेत्याला हेच वाटत.

लोकांनी मताधिकार नोंदवणे टाळावे, लोकांनी निराश व्हावे, उद्विग्न होऊन लोकांना या निवडणूक प्रक्रियेचा तिटकारा यावा. अस लोक निवडणूक प्रक्रिया आणि मताधिकार नोंदवायला उदासीन झाले कि उरलेले लोक एक चपटी आणि पाचशेची नोट देऊन मतदान विकत घेणे सोप्प एकदम. जे या नेत्यांचे भाट आणि भक्त आहेत ते एकगठ्ठा मतदान करणार आहेतच , मग आपण तटस्थ किंवा निष्क्रिय राहिलो तर त्यांच काम सोप होणार आणि मग आपण पुन्हा त्यांनाच शिव्या घालणार ?

राजकारणात तुम्हाला इंटरेस्ट असो अगर नसो, तुम्ही मतदार असाल तर तुमच्यात राजकारणी लोकांना इंटरेस्ट आहेच. मेंदू शाबूत असलेल्या विचारी लोकांना संताप येणे साहजिकच आहे.

पण नेमक्या याच वेळेला निराश न होता जास्तीत जास्त संख्येने छोट्या मोठ्या कुठल्याही निवडणुकीत जास्तीत जास्त संख्येने मताधिकार नोंदवून त्यातल्या त्यात चांगला माणूस निवडणे अतिशय गरजेचे आहे.

भारताची राज्यघटना आणि लोकशाहीने आपल्याला दिलेले अधिकार सक्षमपणे आपल्याला वापरायचे असतील तर प्रत्येक निवडणुकीत जास्तीत जास्त लोकांनी मताधिकार नोंदवून त्यातला त्यात चांगला पक्ष आणि माणूस निवडणे याला पर्याय नाही. सामान्य नागरिक आणि मतदाता म्हणून आपल्या हातात जे आहे ते निदान आपण तरी प्रामाणिकपणे पार पाडूया. काय म्हणता ?

व्हायरल

नागेश हटकर-निरीश्वरवादी तरीही आध्यात्मिक

काल नागेशने शेवटचा श्वास सकाळी सव्वा सहाला घेतला तेंव्हा तो नव्वद वर्षाचा होता असं मला कळलं.

त्याच्या अंत्ययात्रेत मी विचार करू लागलो..

म्हणजे त्याचा जन्म १९३३च्या आसपासचा असेल . म्हणजे स्वातंत्र्याच्या दिवशी तो अंदाजे तेरा चौदा वर्षांचा असेल. १९५८ साली जे जे स्कूल ऑफ आर्ट मध्ये पदवी परीक्षेत गोल्ड मेडल मिळालं होतं. तो उत्कृष्ट फोटोग्राफर होता. त्याने स्वतः चा व्यवसाय सुरू केला होता.

त्या तारुण्याच्या दिवसात तो बाबा आमटेंच्या संपर्कात आला. मात्र तो त्यांच्या बरोबर राह्यला नाही. ठाणे जिल्ह्यातील आदिवासींच्या वेदनेसोबत त्याने स्वतःला जोडून घेतले. मुंबईतील स्वतःचा व्यवसाय बंद करून तो भूमीसेनेचा पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून काम करू लागला. तिथेच त्याची जीवनसाथी ज्योती केळकर भेटली. दोघेही भूमिसेनेचे काम करत. नागेश त्यापूर्वी समाजवादी विचारांशी घट्टपणे जोडलेला होता.

जगदीश गोडबोले सोबत त्याने पश्चिम घाट पालथा घातला. जगदीशच्या पुस्तकातील छायाचित्रे नागेशची आहेत. नागेश नंतर नर्मदा बचाव आंदोलनाचे काम करू लागला.

मेधाताई आणि बाबा आमटे यांना मिळालेल्या आंतरराष्ट्रीय पुरस्कारातून जनसहयोग ट्रस्ट उभा राहिला. नागेश त्या कामात पूर्णपणे रमला.

माझ्यापेक्षा नागेश तीस वर्षांनी मोठा.

पण मी त्याला अहो नागेश असे कधीच म्हंटले नाही. त्याने चळवळीत कायम आमच्या पालकत्वाची भूमिका प्रेमाने निभावली. त्याने आमच्या पिढीवर अतोनात प्रेम केले. खरे तर त्याचा स्वभावच ओसंडून प्रेम करण्याचा होता. समजूतदार होता. मात्र वैचारिक दृष्ट्या तो पक्का ठाम असे. मुख्य म्हणजे ते तो नीट पटवून देई.

समाजवादी चळवळीत तो माझा नेता होता का?

नाही. तो कधीच नेता नव्हता.

अर्थात हे त्याला माहीत होते.

पण तो माझा अनेक अर्थांनी आधार होता. मुख्य प्रश्न नागेशला नेता व्हायचे होते का? हा आहे.

नागेशचे नेमके मोठेपण इथे आहे.

आपण कोण आहोत हे त्याला नेमके माहीत होते.

आपल्या मर्यादा काय आहेत याची नेमकी जाण त्याला होती.

स्वतःला पुरेपूर ओळखल्यावर माणूस स्थिर आणि शांत होतो. तसा नागेश होता.

पूर्ण निरिश्र्वरवादी आणि समाजवादी असलेला नागेश माझ्या दृष्टीने खरा आध्यात्मिक होता.

आज त्याला अलविदा करताना ..खरा तो एकची धर्म ...प्रार्थना म्हणताना मला डोळ्यात अश्रू आले. साने गुरुजींची ही प्रार्थना हेच आपल्या जीवनाचे सार आहे हे उमगलेला नागेश सेक्युलर होता पण तरीही धार्मिक होता असं मला वाटतं. मानवी समाज एका उच्च पातळीवर नेण्यासाठी विशिष्ट मूल्ये समाजात रुजविणे आत्यंतिक गरजेचे असते. ती रुजविण्याचे अनेक मार्ग असतील पण यशाची खात्री नसते. या मूल्यांच्यासाठी कुठलाही त्याग करण्याच्या वृत्तीचा मूलाधार अत्यावश्यक धार्मिकता असते. या अत्यावश्यक धार्मिकतेचा आस्तिक आणि नास्तिकशी संबंध नसतो.

नागेश मध्ये ही अत्यावश्यक धार्मिकता मला पुरेपूर दिसली. त्याच्या आणि ज्योतीच्या सहज जगण्यातून त्याचा प्रत्यय येत असे.

खरा तो एकची धर्म...प्रार्थना पाठ असूनही म्हणता येत नव्हती. गळा दाटून आला.जीवन बदलता येते,समाज बदलतो यावर नागेशची श्रद्धा होती म्हणूनच तो ही लढाई आनंदाने खेळत होता.

यशापयशाच्या पलीकडचे बघणारा नेहमीच लौकिक अर्थाने लढाई हरत असतो.

बुद्ध,फुले,गांधी,आंबेडकर आणि नागेश सुध्दा लढाई हरलेलेच आहेत. स्वप्न एवढं मोठं आहे की आयुष्यात पूर्ण होणारच नाही हे त्यांना माहीताय.

मात्र सर्वात शेवटच्या माणसाच्या चेहेऱ्यावर कधीतरी आनंद दिसेल तेंव्हा त्याची पायाभरणी यांनी केलेली आहे, हे विसरू नये असं आपल्या सारख्या सामान्यांना वाटतं.

-विजय तांबे

लोकसंसद

बेरोजगारीचा सर्वाधिक फटका ग्रामीण भागाला

बेरोजगारीचा दर या आधीच्या म्हणजे मे महिन्यात ७.६८ टक्के पातळीवर होता. त्यात जूनमध्ये वाढ होऊन तो ८.४५ टक्क्यांवर पोहोचला आहे. शहरी भागातील बेरोजगारीचा दर ७.८७ टक्के, तर ग्रामीण भागात हा दर दोन वर्षांतील उच्चांकी पातळीवर ८.७३ टक्क्यांवर पोहोचला आहे.देशातील बेरोजगारीचा दर जून महिन्यात ८.४५ टक्के नोंदविण्यात आला असून, यावर्षी तिसऱ्यांदा हा दर आठ टक्क्यांपुढे गेला आहे.बेरोजगारीचा दर या आधीच्या म्हणजे मे महिन्यात ७.६८ टक्के पातळीवर होता. त्यात जूनमध्ये वाढ होऊन तो ८.४५ टक्क्यांवर पोहोचला आहे. शहरी भागातील बेरोजगारीचा दर ७.८७ टक्के, तर ग्रामीण भागात हा दर दोन वर्षांतील उच्चांकी पातळीवर ८.७३ टक्क्यांवर पोहोचला आहे. ग्रामीण भागातील बहुतांश जनता प्रामुख्याने शेतीवर अवलंबून आहे. पिकांची काढणी मे महिन्यात पूर्ण झालेली असते आणि पेरणीचा हंगाम यंदा मान्सूनचे आगमनच उशिरा झाल्याने जुलैपासून सुरू होत असल्याने जून महिन्यात शेतीची फारशी कामे नसतात. त्याचा परिणाम ग्रामीण बेरोजगारीची पातळी लक्षणीय वाढण्यात झाला, असे प्रतिष्ठित संशोधन गट असलेल्या 'सेंटर फॉर मॉनिटरींग इंडियन इकॉनॉमी'ने म्हटले आहे. केंद्र सरकार समोर बेरोजगारी कमी करण्याचे मोठे आव्हान आहे. मागील काही काळात विविध सरकारी विभागांमधील कर्मचाऱ्यांना नियुक्तीपत्रे वाटपाचे कार्यक्रम घेतले जात आहेत. त्यांनी या वर्षाच्या अखेरपर्यंत दहा लाख जणांना सरकारी नोकरी देण्याचे आश्वासन दिले आहे. तरीही बेरोजगारीचा दर वाढत असल्याने सरकारच्या चिंतेत भर पडत आहे.ग्रामीण भागातील बेरोजगारीचा दर सध्या जास्त आहे. पुढील वर्षी लोकसभा निवडणुका होणार आहेत. त्यामुळे भाजपला पुन्हा सत्तेवर येण्यात बेरोजगारीचा मुद्दा सर्वांत मोठा अडसर ठरण्याची चिन्हे आहेत. या सध्याच्या काळातील मोठ्या आव्हानावर सरकारला दोन्ही पर्वात फारशी कामगिरी करता आलेली नाही हेच खरे.

- राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव

प्रेरणा

विश्वास

प्रख्यात वैज्ञानिक नील्स बोरच्या घरात हॉलमध्ये दर्शनी भागात घोड्याचा एक नाल टांगलेला होता. घोड्याचा नाल शुभ असतो, तो घरात टांगला तर बरकत येते, अशी त्याच्या देशातली अंधश्रद्धा आहे. सगळे शास्त्रज्ञ काही वैज्ञानिक विचारांचे नसतात. काहींचा मुहूर्त, कर्मकांडं, श्रद्धा, अंधश्रद्धांवर विश्वास असतो. बोर मात्र अंधश्रद्धाविरोधक म्हणून प्रसिद्ध होता.

त्यामुळेच एका पाहुण्याने एकदा त्याला विचारलं, तुम्ही हा नाल कसा लावलात घरात. तुमचा या नालाच्या अंधश्रद्धेवर विश्वास आहे?

बोर म्हणाला, बिलकुल नाही.

पाहुणा चक्रावला. म्हणाला, मग हा नाल का लावलात?

बोर म्हणाला, हा नाल मला ज्याने दिला त्याने सांगितलंय की तुमचा विश्वास असो वा नसो, बरकत येतेच. मग मला सांगा की, माझा विश्वास नाही, याने काय फरक पडतो?

-ओशो

निवडक

बुद्ध विहारचे उद्घाटन

उरण : उरण शहरातील बौद्धवाडा येथील बुद्ध विहारचे उरणचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश निकम यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी रूषिकेश म्हस्के, प्रकाश कांबळे, विजय पवार, विनोद कांबळे, हर्षद कांबळे, अखिलेश जाधव, जितेंद्र भोरे, संतोष कांबळे, विशाल कवडे, हरिश्चंद्र गायकवाड, धनेश कासारे, अजय कवडे, माता रमाई महिला सुनिता सपकाळे, करुणा भिंगावडे, स्वप्नाली कवडे, संगिता जाधव, सर्व उपासक व उपासिका उपस्थित होते.

तहसीलदारपदी विजय पाटील

पनवेल : पनवेल तहसीलदारपदाचा विजय पाटील यांनी पदभार स्वीकारला आहे. तहसीलदार विजय तळेकर यांच्या वैद्यकीय कारणास्तव रिक्त झालेल्या जागेवर ही नियुक्ती करण्यात आली आहे, त्यानुसार यांनी आपला पदभार स्वीकारला. तळेकर यांनी कारकिर्दीत उल्लेखनीय प्रशासकीय कामकाज केले होते. यांनी कार्यकाळ सांभाळल्यापासून प्रशासकीय पातळीवर विविध सकारात्मक निर्णय घेतले. तालुक्यातील आदिवासी बांधवांच्या समस्या याबाबत सकारात्मक कार्य केले.

तळोजाः इसम बेपत्ता

पनवेल : पनवेल जवळील तळोजे फेज ०२ येथून एक ३५ वर्षीय इसम कोणास काहीएक न सांगता कोठेतरी निघून गेल्याने तो बेपत्ता झाल्याची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. छक्क थापा भोटे असे या इसमाचे नाव असून तो मूळचा नेपाळ येथील रहिवाशी आहे. तो अंगाने मध्यम, उंची ५ फूट १ इंच, रंग गोरा, चेहरा गोल, डोळे काळे, नाक सरळ, असा वर्णन आहे. सदर इसमाबाबत कोणास काही एक माहिती असल्यास तळोजा पोलीस ठाणे किंवा सुनील होलार (मो.क्र.८१०८१६१७०९) यांच्याशी संपर्क साधावा.

डासांचा प्रादुर्भाव

उरण : पावसाचा जोर वाढत आहे, त्यामुळे रहिवाशांना सर्दी, खोकला, ताप, काविळ सह इतर आजारांनी ग्रासले आहे. हे रुग्ण खासगी रुग्णालयात उपचार करण्यासाठी दाखल होत आहेत. परंतु खास रुग्णालयात डासांचा प्रादुर्भावाचा सामना रुग्ण व रुग्णांचे नातेवाईक यांना सहन करावा लागत आहे. तरी जिल्हा आरोग्य विभागाचे वैद्यकीय अधिकारी यांनी खबरदारी म्हणून खासगी रुग्णालयांना स्वच्छतेचा संदेश द्यावा, अशी मागणी रुग्णांचे नातेवाईक करत आहेत.

विद्यार्थ्यांचा गुणगौरव

पनवेल : महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी संचालित आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालयात शुक्रवारी (ता. ३०) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांसाठी गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अपर्णा ताम्हणकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी समिता सोमण, मनीषा महाजन, निशा देवरे, नमिता जोशी उपस्थित होत्या. याप्रसंगी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत यश संपादन केलेल्या मराठी व इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना गौरवण्यात आले.

दिन वार्ता

पंचांग

६ जुलै २०२३, गुरुवार
विक्रम संवत२- २०७९
आषाढ शके संवत२- १९४५
संवत्सर - शोभननम
अयन- दक्षिणायन
मास- आषाढ,ऋतु- ग्रीष्म,कृष्ण पक्ष
तिथि:तृतीया ०६:३०:३२
तिथि : चतुर्थी २७:१२:४९+
नक्षत्र : धनिष्ठा २४:२५:११+
योग: प्रीति २४:००:०२+
करण : विष्टि ०६:३०:३२
करण : बव १६:४९:२१
करण:बालव २७:१२:४९+
सूर्य : मिथुन
चन्द्र: कुम्भ १३:३८:२६
हिजरी सन२ - १४४४
मुस्लिम मास - जिल्काद
तारीख - १७
विशेष:सूर्याचा प्रनर्वसु नक्षत्रप्रवेश वाहन: गाढव,शाडिल्या माहराज पुण्यतिथी - गोकर्ण संकष्ट चतुर्थी चंद्रोदय १०.१२मुंबई २२.४२अकोला २२.३०अलिबाग २२.४३

सुडोकू

	3							
7	8	1	9	5		6		
			6	3			1	7
	5	2		7	6		3	
	9		8	1		2	7	
1	4			8	3			
		8		4	7	1	5	9
							4	

बुधवारच्या अंकातील कोड्याचे उत्तर

6	2	9	3	7	4	8	1	5
4	3	7	1	5	8	9	6	2
5	1	8	6	9	2	4	7	3
8	5	1	7	4	6	3	2	9
3	7	2	5	8	9	6	4	1
9	4	6	2	3	1	5	8	7
1	8	5	9	6	7	2	3	4
7	9	4	8	2	3	1	5	6
2	6	3	4	1	5	7	9	8

महामार्गावर टाळ मृदुंगाचा आक्रोश

जनआंदोलन उभारण्याचा इशारा, प्रांताधिकाऱ्यांना निवेदन सादर

। माणगाव । वार्ताहर ।

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम गेली १३ वर्ष सुरू आहे. अद्यापही अनेक टप्प्याचे कामकाज अपूर्ण आहे. महामार्गावर अपघाताची मालिका देखील सुरूच आहे. लवकरात लवकर महामार्ग व्हावा यासाठी मंगळवार दि. ०४ जुलै रोजी माणगांवमध्ये महामार्ग जनआक्रोश समितीच्या पुढाकाराने माणगांव आगार ते प्रांताधिकारी कार्यालय अशी टाळ-मृदंगाच्या गजरात पदयात्रा काढण्यात आली.

माणगाव आगार पासून प्रांताधिकारी कार्यालयापर्यंत निघालेल्या या पदयात्रेत मोठ्या संख्येने माणगावकर सहभागी झाले होते. यावेळी आदोलकांनी या महामार्गाकडे कोणीच लक्ष दिलेले नाही. आजपर्यंत महामार्गावरून फक्त राजकारण केले जात असल्याने जनआक्रोश समितीने या विषयावरून आता जनआंदोलन उभारण्याचा निर्णय घेतला आहे.

याच अनुषंगाने या पदयात्रा आंदोलनातून नव्याने रुजू झालेले प्रांताधिकारी संदीपान सानप यांचे लक्ष वेधण्यात आले आहे. तसेच प्रशासकीय स्तरावर महामार्गाचे काम जलदगतीने पूर्ण करण्याबाबत निवेदनातून मागणी करण्यात आली.

> १३ वर्ष महामार्गावर जीव मुठीत घेऊन प्रवास करीत आहेत. त्यामुळे महामार्गाचा प्रश्न मार्गी लागत नाही, तोपर्यंत सर्वांना सोबत घेऊन लढा लढणार आहे.
> – संतोष रणपिसे, जिल्हाध्यक्ष महामार्ग जनआक्रोश समिती

शाळाबाह्य विद्यार्थ्यांचा शोध सुरू

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

शासनाच्या आदेशानुसर आदिवासी समाजातील मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शाळा बाह्य विद्यार्थी शोधून त्यांच्या पालकांना भेटून शिक्षण किती आवश्यक आहे. याचे महत्व पटवून देऊन शाळा बाह्य विद्यार्थी प्रत्यक्ष शाळेत येऊन शिक्षण सुरू करण्यासाठी नांदगाव हायस्कूल येथील शिक्षक आदिवासीवाडी व अन्य ठिकाणी भेट देऊन या विद्यार्थ्यांना शाळेत आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.

आदिवासी समाजातील मुले नांदगाव हायस्कूल येथे शिक्षण घेण्यासाठी यावी यासाठी या हायस्कूलचे शिक्षक प्रतिनिधी महेश वाडकर व होम गार्ड सार्थक शेडगे यांनी आदाड येथील मनेर पाडा येथील आदिवासीवाडी येथे भेट देऊन पालकांना संबोधित करून आपल्या मुलांना शाळेत पाठवण्याचे अवहन केले.

शाळेत मुले आल्यावर त्यांना पुस्तक वह्या व अन्य तत्सम मदत सुधा करण्याचे आश्वासन देण्यात आले. यासाठी मुख्याध्यापक श्रीधर ओव्हाळ व शिक्षक वृंद अशी मुले शाळेत आणण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.

पोलीस निरीक्षकपदी सुरेंद्र गरड

कर्जत : कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक के. डी. कोल्हे यांची बदली अलिबाग मुख्यालयात झाल्याने तेथील रिक्त असलेल्या जागेवर सुरेंद्र जगन्नाथ गरड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. गरड हे मुंबई येथे लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपअधीक्षक म्हणून कार्यरत होते. त्यांनी नवी मुंबई, अलिबाग येथेही काम केले असून त्यांनी तब्बल आठ वर्षे गडचिरोली येथे काम केले आहे. त्यांनी कर्जतमध्ये होणाऱ्या चोऱ्यांचा बंदोबस्त करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

आवरे शाळेत विविध उपक्रम

। उरण । वार्ताहर ।

कान्होजी आंग्रे यांच्या पुण्यतिथी निमित्ताने आवरे येथील प्राथमिक शाळेत मंगळवारी (दि.४) बालसभेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी माजी आ. मनोहर भोईर,आवरे प्रिमीयर लीग, सेवानिवृत्त कर्मचारी संघ उरण यांनी शाळेत वह्या वाटपाचा कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी ग्रुप ग्रामपंचायत आवरे यांजकडून व गणेश गावंड, नागेंद्र म्हात्रे, डॉ. हिराचंद्र, शंकर पाटील यांजकडून वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित केला. याप्रसंगी संतोष ठाकूर, आत्माराम गावंड, निरा पाटील, प्रमिला म्हात्रे, भावना म्हात्रे, ममता पाटील, संजय गावंड, संतोष पाटील, सुनिल ठाकूर, अमित म्हात्रे, दौलत भोईर,ओमकार रिसबूड, अविनाश पाटील, केशव गावंड, संजय धबडे,.साहेबराव ओव्हाड, सुरेश भोईर बबन पाटील, निर्भय म्हात्रे,अहिरे, गणेश प्रसाद, सोमनाथ म्हात्रे, शंकर पाटील, प्रतीक्षा गावंड, सुवर्णा म्हात्रे, माई म्हात्रे, अलका गावंड, प्रमोद म्हात्रे, रुपाली चव्हाण उपस्थित होते.

विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ

। तळा । वार्ताहर ।

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे कला-वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय तळा इयत्ता ११ वीच्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ महाविद्यालयाच्या सभागृहात पार पडला. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष, गो म वेदक विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन, संस्थेचे सदस्य, प्राचार्य आदी मान्यवर उपस्थित होते.

स्वागत समारंभाप्रसंगी इयता १२ वीच्या विद्यार्थ्यांनी ११ वीच्या विद्यार्थ्यांचे स्वागत केले. यावेळी ओमकार बटावळे, श्रुती ठाकूर, वैष्णवी बेडेकर, रिया तळकर, निखलिशा लोखंडे, सुविधा पाटील, समृद्धी गवारकर, शितल शेलार यांनी महाविद्यालयात प्रवेश का घेतला याचे कारण सांगितले.यावेळी प्रा. वाले आर बी, प्रा. भुरे टी एन, प्रा. सर्जे व्ही बी, तसेच संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. आभार प्रा.एन. टी. मचे यांनी मानले.

विद्यार्थ्यांचा गुणगौरव

। खांब । वार्ताहर ।

रायगड गणित विज्ञान अध्यापक मंडळ व पंचायत समिती शिक्षण विभाग रोहा यांच्या संयुक्त विद्यमानाने घेण्यात आलेल्या गणित संबोध शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल नुकताच लागला. या परीक्षेत शिष्यवृत्ती प्राप्त व विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण सोहळा रोहा येथील को. ए.सो. मेहेंदळे हायस्कूल येथे संपन्न झाला. सदर कार्यक्रम पं. समितीच्या गटशिक्षणाधिकारी मेघना धायगुडे या उपस्थित संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी प्रा. रमेश मोसे रायगड गणित विज्ञान अध्यापक मंडळाचे सहसचिव तथा रोहा तालुका विज्ञान अध्यापक मंडळाचे अध्यक्ष टिळक खाडे, उपाध्यक्ष विलास जाधव तसेच पंचायत समितीच्या साधन व्यक्ती सांगिता धामणसे, मनिषा पाटील, तसेच रोहा तालुक्यातील विविध शाळांचे शिक्षक, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शब्दकोडे क्र.१७३



आडवे शब्द : १.जसा राजा तशीच त्याची प्रजा असते या अर्थी एक म्हण६.संगर,काला१०.नवरा मुलगा११.शहर१२.पोळया भाजण्याचे साधन१३.शिजवलेली दाळ१५.साम्यता,असमानताच्या विरूध्द१७. कपाळ,ललाट१८.फळातील द्रव१९.'-- पुरता मामा' एक म्हण२०. कागद फाटण्याचा आवाज२१.सावध,दक्ष२२.आण,कसम मराठीत २४.खराब उलटा करा२७.सरळ,तडक२८.बाण,शर२९.हृदय३०. उपयोग३२.हिरकणीचा उपयोग ही कापण्यासाठी होतो३४. कावळयाचा रंग३५.भार,ओझे३६.अटीतटीची भाशा३७.केस काळे करण्याचे साधन३८.नकली,बनवलेला३९अ.इंग्रजीत चावी४०. वडीलांचा भाऊ४१.दुसऱ्याच्या शरीरात प्रवेश करणे४४.पहाटे आरवणारा प्राणी,कॉक मराठीत४६.सुगंध,दरवळ४८.एक लिपी ४९.मासा पकडण्याचा आकडा५१.शिवाय,म्हैस५२.भेट,संगम५३. सापाने टाकलेली त्वचा५४.हार,सर५५.भिंतीवर सरपटणारा सरडयाच्या जातीचा एक प्राणी५६.प्रजा,जन५७.वासना,इच्छा६०. घुसणे,प्रवेश करणे६२.एक फुल झाड६३.खाली,रिता६४.फटाक्यांची माळ६५.योग्य,सुरळीत६६.एक काटेरी फळ६९.उणीव,ददात७२. लकाकी,चमक७३.पवन,वात७५.मादीचा जोडीदार७६.थापा मारणारा७७.चोप,ताडण७८.सडेतोड,सणसणीत

उभे शब्द:१.वेळ मिळेल तसा,सवडीप्रमाणे२.सिता हरण करणारा राक्षस३.परस्त्रिशी संग ठेवणारा४.डामडौल,ऐट५.माहीतगार,ज्ञात असलेला६.उन्हाळयातील लिंबु पाणी पेय७.गोड बोलणारा,भाशण करणारा८.प्रश्न हिंदीत९.खरडुन पूसून,भेदभाव न करता १४.लक्ष्मीपती,विष्णु१५.वरचढ,डोईजड१६.नराचा बळी१८. रात्री बाहेर फिरायला निघणारा२३.भितीने होणारा शरीराचा कंप२५.राजकिर्द,सत्तेचा कालावधी२६.एक सरपटणारा प्राणी२९. इच्छा,वासना३०.स्त्रीया संक्रांतीला हे देतात३१.धुळकण३२.ऐन तिन्ही सांजेची वेळ३३.घराबाहेर न निघुन कुणासोबत ही न मिसळणारा ३८.भिमाने वध केलेला एक खादाड राक्षस३९.घर,भवन हिंदीत४१. दुसऱ्यांवर उपकार करणारा४२.एक विदेशी मदय प्रकार४३.विकास झालेला,विकसनशील४५.उपेक्षा करणे,अनादर करणे४७.हे म्हणजे ते व ते म्हणजे हे५०.तळे,सरोवर५४.मालवणी भोशत मला५५. स्वयंपाक शास्त्र५८.एकोणचाळीस उभेचे उत्तर पहा५९.अभंगातील नामदेव महाराज६१.रडुन सांगीतलेली कथा६६.मुसलमानी भिक्षुक ६७.एक अधिक पाव६८.'देवाची --- अन नारळात पाणी'७०. ग्रामिण स्वप्न७१.नेहमी रडणारा७२.खंदक,खाण७४.रक्षा,राखुंड ७५.बोटाच्या अग्रभागावरील कठीण आवरण

शब्दकोडे क्र.१७२ चे उत्तर

आडवे उत्तर

१.जवळपास ४.गजवदन ८.पाप १०.तारामती १२.यजमान १३.मरगळ १५.समाधान १७.मग १८.तम १९.यंत्रमाग २१.नवा २२.सदाचार २३.सव २४.शहर २५.रयत २८.सर्वत्र २९.प्रयास ३१.मागे हटणे ३३.कोमट ३५.ज्ञात ३६.कळस ३७.नर ३८.मुद्दाम ३९.नाका ४०.गीत४२.फटका ४३.लखलखीत ४८.रसातल ५०.दमा ५२.जन ५३.मासा५५.चल ५६.कमलाकर ५७.म हिना ५८.वध ६०.वारुळ ६१.बारदान६३.धनगर ६५.लगत ६७.मधमाशी ७०.वाळू ७१.आळस ७३.महान ७५.सरणे७६.घोडनवरा ७९.सल ८०.नात ८१.फारसा ८२.ओळ ८३.समानता

उभे उत्तर

१.जनमत २.पाताळयंत्री ३.सरा ४.गती ५.वर्तमानपत्र ६.नयन ७.दिमाखदार ९.पलंग ११.मलमास १४.रमणीय १६.धावा १७.मरणयातना २०.गवसणे २२.सह २४.शरम २५.रजक २६.तमासगीर २७.दहन २९.प्रज्ञा ३०.सरकारजमा ३२.टरफल ३३.कोमल ३४.टपाल३८.मुकादम ३९अ. कारनामा ४१.तसाच ४४.खबरबात ४५.खीज ४६.तनमनधन ४७.मामा ४९.तलवार ५१.मालामाल ५४.सावध५६.कळवळणे ५९.घनवान ६२.दाम ६४.गळू ६६.गरुड ६८.शीतलता६९.सामना ७१.आरसा ७२.पाव ७४.हात ७५.सर ७६.घोळ ७७.नफा७८.रास ७९.सन

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

वानप्रस्थ साजरा करा अन्नदानाने

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क-

८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते

१. श्री. रमाकांत नारायण पिसाट, अलिबाग

विद्यार्थ्यांनी घेतली वृक्षारोपणाची प्रतिज्ञा

। पाली । वार्ताहर ।

सुधागड तालुक्यातील नेणवली शाळेत विविध उपक्रमाद्वारे कृषिदिन साजरा करण्यात आला. यानिमित्त वृक्ष दिंडी काढण्यात आली. विद्यार्थ्यांनी परिसरात रोपलागवड करत वृक्षारोपणाची प्रतिज्ञा घेतली. गटशिक्षणाधिकारी साधुराम बांगारे व केंद्रप्रमुख कल्पना पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला.

वृक्षारोपणासाठी ग्रामपंचायत नेणवलीमार्फत शेवग्याची रोपे उपलब्ध करून देण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला वृक्षारोपण प्रतिज्ञा घेण्यात आली. त्यांनतर ग्रामपंचायतीमधून वृक्षदिंडी काढण्यात आली. झाडे लावा, झाडे जगवाच्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमला.

शाळेतील मुलांनी 'एक विद्यार्थी-एक झाड' उपक्रमाअंतर्गत काही झाडे आणली. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष किसन कोंडे, मुख्याध्यापक राजेंद्र अंबिके, विषय शिक्षक रवींद्र हंबीर व सर्व विद्यार्थ्यांनी परिसरात रोपलागवड केली. तसेच नेणवली उपकेंद्र अंतर्गत वैद्यकीय अधिकारी डॉ. निर्मल, आशा कार्यकर्त्या गोळे आणि सहायकांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. मुख्याध्यापक राजेंद्र अंबिके यांनी कृषीदिनाचे महत्त्व व वृक्ष निगा, जोपासना याबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली.

पिरवाडी किनाऱ्यावर जाण्यास बंदी

। उरण । वार्ताहर ।

पावसाळ्यात समुद्र खवळलेला असल्याने सुरक्षेच्या कारणाने नागरीक आणि पर्यटकांनी किनाऱ्यावर येऊ नये आशा सूचना स्थानिक ग्रामपंचायतीने दिल्या आहेत. त्यासाठी परिसरात धोक्याचा इशारा देणारे फलक ही लावण्यात आले आहेत.

पिरवाडी किनाऱ्यावर सुट्टीच्या दिवशी पावसाळ्यात ही मोठया प्रमाणात पर्यटक येतात. यातील अनेक पर्यटकांना समुद्राच्या पाण्याचा व लाटांचा अंदाज नसतो, त्यामुळे समुद्रात बुडण्याची शक्यता असते. आशा घटना यापूर्वी घडल्या आहेत. त्यातच जुलै महिन्यातील भरतीच्या वेळी प्रचंड लाटा उसळत असल्याने या धोकादायक परिस्थितीत ही जीवाला धोका निर्माण होत असल्याने पिरवाडी समुद्र किनाऱ्यावर येणाऱ्या स्थानिक नागरीक व पर्यटकांच्या सुरक्षेसाठी नागाव ग्रामपंचायतीने सूचना फलक लावले आहेत. त्याचे पालन करण्याचे आवाहन सरपंच चेतन गायकवाड यांनी केले आहे. त्याचप्रमाणे नवीमुंबई पोलीसांच्या सागरी सुरक्षा विभागाचे सुरक्षा कर्मचारी ही तैनात करण्यात आले आहेत. मात्र सुट्टीच्या दिवशी पिरवाडी किनाऱ्यावर मोठ्या संख्येने पर्यटक येत आहेत. त्यामुळे वाहनांची ही तुफान गर्दी होते. नियमांचे उल्लंघन करीत पर्यटन स्थळी जाणाऱ्यांवर कठोर कारवाई होण्याची गरज निर्माण झाली आहे.

ग्रामपंचायतीकडून धोक्याचा इशारा

निवडक

डेस्क किटचे वाटप

पनवेल : लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगमतर्फे तक्का येथील नगरपालिकेच्या प्राथमिक शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना डेस्क किट वाटप करण्यात आले. आय आय टी, कानपूर येथे बनवलेल्या या किटमध्ये सॅक व लिहिण्याचे टेबल असून विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी याचा उपयोग होईल असा विश्वास स्वाती गोडसे यांनी व्यक्त केला. शाळेच्या मुख्याध्यापिका संध्या सावळे यांनी उपस्थितांचे स्वागत केले तर सूत्रसंचालन वैभव पाटील यांनी केले.

तरुणास अटक

पनवेल : तळोजा फेज ०१, सेक्टर ०२ येथील उद्यानामध्ये अमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या तरुणाला तळोजा पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्या विरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. नेहमीप्रमाणे गस्त घालणाऱ्या तळोजा पोलिसांना तळोजा फेज १ सेक्टर २ येथील उद्यानात आरोपी सोहील समद शेख (वय २४, रा. नावडेफाटा) हा काळ्या रंगाचा ओलसर चरस अमली पदार्थाचे सेवन करताना मिळून आला. तळोजा पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याच्या विरुद्ध अंमली पदार्थ विरोधी कारवाई केली आहे.

महिलेस शिवीगाळ

पनवेल : दुपट्ट करण्यासाठी दिलेले पैसे कंपनी बंद पडल्याने परत न मिळाल्याचा राग मनात धरून फिर्यादी महिलेला शिवीगाळ केल्याची घटना घडली आहे. नेरुळ येथील रविंद्र कसबे यांनी त्याचे पैसे फिर्यादी महिलेच्या मुलाला डबल करण्यासाठी दिले होते. मात्र पैसे दिलेली कंपनी बंद झाल्याने रवींद्र कसबे याने फिर्यादीच्या मुलाकडे पैसे मागण्यासाठी त्याच्या घरी गेला असता फिर्यादी महिलेने मुलगा घरी नाही असे सांगितल्याने त्याचा राग मनात येवून फिर्यादी महिलेला शिवीगाळ करून धमकी दिली.

कळंबोलीत वृक्षारोपण

पनवेल : कळंबोलीमधील सेक्टर- १ के. एल. ई. कॉलेजच्या बाजूच्या छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर दिवंगत मनोहर खानावकर यांचे स्मरणार्थ वृक्षारोपण व पावसाळी क्रिकेट सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. त्या अनुषंगाने क्रिकेटप्रेमी व खेळाडू तसेच कळंबोलीमधील नागरिकांनी या मैदानाच्या चहुबाजूला वृक्षारोपण केले. या ठिकाणी शोभेची झाडे न लावता मोठी सावली देणारी झाडे लावण्यात आली आहेत. यावेळी प्रा. राजेंद्र पालवे, सुदाम पाटील, अनिल नाईक व नागरिक उपस्थित होते.

वहाळ येथे कार्यक्रम

उरण : श्री साई देवस्थान साई नगर वहाळ येथे सोमवार (दि.३) गुरुपौर्णिमा उत्सव निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी काकड आरती, मंगल स्नान, मध्यान्ह आरती करण्यात आली. सायंकाळी धुपारती, गुरुकृपा प्रासादिक भजन मंडळ कोपर यांचे भजन झाले.देवस्थानचे संस्थापक रवी पाटील यांनी व देवस्थानच्या सर्व टीमने सर्व कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

जेएनपीटी पालकांचे गेट बंद आंदोलन

मागण्या मान्य करण्याचे प्रशासनातर्फे आश्वासन; माजी आ. मनोहर भोईर यांची मध्यस्थी

। उरण । वार्ताहर ।

जेएनपीए वसाहतीमध्ये कार्यरत असलेल्या आर. के. एफ जवाहरलाल नेहरू पोर्ट विद्यालय शेवा या संस्थेच्या मनमानी व एकतर्फी कारभाराविरोधात लोकशाही व कायदेशीर मार्गाने वरिष्ठ पातळीवर व संबधित विभागांना पत्रव्यवहार करून देखील विद्यार्थी व पालकांच्या समस्या सूटत नव्हत्या. शिक्षक, पालक विद्यार्थ्यांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत होते. शिक्षण संस्थेच्या निष्क्रीय व मनमानी कारभाराचा निषेध करण्यासाठी व शिक्षक, पालक, विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी पालक संघर्ष समितीतर्फे मंगळवार (दि. ४) गेट बंद आंदोलन केले.

प्रशासकीय अधिकारी पूजा अंजनीकर यांचे त्वरीत निलंबन करावे. तीन वर्षापासून ज्या शाळेत इमारतीमध्ये जे वर्ग भरत होते तेच पूर्ववत करावे. इयत्ता ८ वी ते १० वी मराठी माध्यमिक विद्यार्थ्यांना शासनाकडून आलेला अनुदान शाळेने घ्यावा व पालकांच्या मुलांची फी पूर्णपणे माफ करावी. शिक्षकांना शासनाच्या नियमाप्रमाणे पूर्ण वेतन मिळावे. अशा विविध मागण्यासाठी पालक संघर्ष समितीच्या माध्यमातून पालक संघर्ष समितीचे अध्यक्ष किरण घरत व शिक्षक नेते नरसु पाटील यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले.

सदर आंदोलनाची दखल घेत, प्रशासनाने त्वरित पालकांना तसेच विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी, पालक, शिक्षक व प्रशासन यांच्यात बैठक झाली. बैठकीत माजी आ. मनोहर भोईर, दिनेश पाटील, नरसु पाटील, एल. बी. पाटील, महादेव घरत, रेखा घरत, रत्नदिप पाटील, तुषार घरत, किरीट पाटील, सुरेश पाटील, रवि घरत, रमाकांत म्हात्रे, रमाकांत गावंड, गिरीश पाटील, प्रमोद कांबळे, किरण घरत, अमर म्हात्रे, रेखा ठाकूर,योगेश तांडेल, विश्वास पाटील, अजय खाडे, लिलेश्वर ठाकूर, अविनाश म्हात्रे, रंजना म्हात्रे, प्रियदर्शनी म्हात्रे, पल्लवी जोशी, जागृती ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पालक, शिक्षक, विद्यार्थ्यांच्या मागणीबाबत सविस्तर चर्चा झाली. पालकांच्या शिक्षकांच्या मागण्या मान्य झाल्याने गेट बंद आंदोलन स्थगित करण्यात आले. पालकांनी, शिक्षकांनी गेट बंद आंदोलनास प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पाठिंबा दिलेल्या सर्व मान्यवरांचे व मागण्या मान्य होण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

पती-पत्नीने गमावले सव्वादोन लाख रुपये

पनवेल : रिफंड अमाऊंट परत न करता पती-पत्नीच्या खात्यामधून दोन लाख २७ हजार डेबिट करून फसवणूक केल्याप्रकरणी अनोळखी इसमाविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रिटघर येथे राहणाऱ्या विना प्रियोळकर यांचे पती रायू प्रियोळकर हे सेंट्रल रेल्वे मुंबई येथे नोकरी करतात. त्यांनी जिओ मार्ट वर ग्राइंडर खरेदी केले होते. ग्राइंडरचे सर्व पार्ट्स आले नसल्याने त्यांनी ग्राइंडर रद्द करून परत रिफंड मिळण्याची रिक्वेस्ट पाठवली.

मात्र ग्राइंडर परत घेण्यास व पैसे परत देण्यास कोणी आले नाही. त्यामुळे त्यांनी गुगलवर कस्टमर केअरचा नंबर सर्च केला. त्यावेळी कॉल केला असता तुषार सिंघम नावाचे इसम बोलत असल्याचे सांगितले. यावेळी त्या इस्माने गुगल पे चालू करण्यास सांगितले व एनी डेस्क ॲप डाऊनलोड करण्यास सांगितले. त्यावेळी मोबाईल क्रमांकाचे पहिले पाच अंक टाकण्यास सांगितले. तरीही पैसे परत आले नाहीत. त्यांनी दुसऱ्या दिवशी पुन्हा कॉल करून पैसे आले नसल्याचे सांगितले. यावेळी त्यांनी दुसरा खाते क्रमांक मागितला. त्यांनी पतीचा खाते क्रमांक संलग्न असलेला मोबाईल नंबर दिला. पती यांच्या मोबाईलवर देखील एनी डेस्क ॲप डाऊनलोड करण्यास सांगितले व प्रोसिजर करण्यास सांगितली. त्यांनी मोबाईल क्रमांकाचे शेवटचे पाच अंक गुगल पे वर टाकण्यास सांगितले असता त्यांनी ते टाकले. यावेळी पतीच्या खात्यातून ९७ हजार ३४ रुपये डेबिट झाले. कस्टमर केअरमधून बोलणाऱ्या इसमाने दोन लाख २७ हजार ३७० रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

जिल्हा कोमसापची बैठक संपन्न

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल येथे रायगड जिल्हा कोकण मराठी साहित्य परिषदेची बैठक झाली. जिल्ह्यात खूप बोलीभाषा आहेत, या बोलीभाषांचे संवर्धन झालं पाहिजे असे आवाहन कोकण मराठी साहित्य परिषदेच्या अध्यक्षा नमिता कीर यांनी पनवेल येथे केले. या बैठकीस कोकण मराठी साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. प्रदीप ढवळ, कोकण मराठी साहित्य परिषदेच्या युवाशक्ती प्रमुख दीपा ठाणेकर, कोमसापचे जनसंपर्कप्रमुख प्रा. एल.बी.पाटील, उपाध्यक्षा सुजाता पाटील, गणेश कोळी उपस्थित होते. या बैठकीचे आयोजन कोमसाप पनवेल आणि नवीन पनवेल शाखेच्यावतीने करण्यात आले.उपस्थितांचे आभार अजित शेडगे यांनी मानले.

मुरुड मच्छीमारांचे तहसीलदारांना साकडे

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

मुरुड नगरपरिषदेतर्फे समुद्राकिनारी सुरुचे बन ते एम.डी.डी.सी. हॉटेल व विश्रामबाग ते मुरुड कोळीवाडा या परिसरामध्ये सुशोभिकरणाचे काम सध्या सुरू आहे. सदरचे काम सुरू झाल्यापासून त्याठिकाणी वाळुचे उत्खनन होऊन संपूर्ण वाळु समुद्रामध्ये लोटली गेली आहे. त्यामुळे एकदरा खाडीजवळ मोठ्या प्रमाणात गाळ साचला झाले आहे. त्यामुळे होड्या आत-बाहेर काढण्याकरिता मच्छीमारांना कसरत करावी लागत आहे.

एकदरा व मुरुड खाडीलगत ३०० ते ४५० नौका असुन त्याचा मच्छीमारी व्यवसायावर उदरनिर्वाह आहे. त्यामुळे मच्छीमारांचे आर्थिक नुकसान होत आहे. चालु असलेल्या

कामामुळे वाळुचा साठा दिवसेंनदिवस वाढत असल्याने खाडी बंद होण्याची परिस्थिती तयार झाली आहे. याचा परिणाम पावसाळ्यात मिळणाऱ्या मच्छीवर झाला आहे. यामुळे जोपर्यंत बंधारा मंजुर होत नाही तो पर्यंत सुशोभिकरणाचे काम बंद करण्यात यावे. या संदर्भात रितसर निवेदन मुरुड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी व तहसीलदारांना देण्यात आले.

यावेळी शुभांगी करडे, पांडुरंग आरेकर, जगन्नाथ वाघरे, महेंद्र गार्डी, यशवंत सवाई, प्रकाश सरपाटील, चिंतामणी लोदी, धुर्वा लोदी,मनोहर जंजिरकर आदिंसह मान्यवर निवेदन देतेवेळी उपस्थित होते.

पेंधर रेल्वे फाटकाकडील रस्त्यांवर खड्डे

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल तालुक्यातील पेंधर पुलालगत पेंधर रेल्वे फाटकाकडे नागरिक ये-जा करणाऱ्या रस्त्यांवर खड्डे पडले आहे. रात्री अंधारात अनेक दुचाकी चालक पडून अपघाताच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे सिडको प्रशासनाने सदर रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजवावेत, अशी मागणी येथील रहिवाशांकडून केली जात आहे.

पेंधर रेल्वे फाटक ओलांडून तळोजा फेज-२ या वसाहतीत प्रवेश करताच मसिडकोफक्रडून पेंधर पुलाच्या दोन्ही बाजुने असलेल्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. गेल्या वर्षभरात फेज-२ मध्ये नागरिक मोठ्या प्रमाणात वास्तव्यास आले आहेत. त्यामुळे बहुतांश नागरिकांना पनवेल आणि नवी मुंबई परिसरात नोकरी तसेच कामानिमित्त जाताना खड्डेमय रस्त्यावरुनच जावे लागत आहे. पुलाच्या दोन्ही बाजुचा रस्ता खड्डेमय बनला आहे. विशेष म्हणजे रात्रीच्या वेळी पथदिवे बंद असल्यामुळे खड्ड्यात पडून दुचाकी चालक जखमी झाल्याचे प्रकार घडले आहेत. त्यामुळे तळोजातील रहिवाशांनी पनवेल महापालिकेच्या अधिकाऱ्यांना सदर खड्डेमय रस्त्याची माहिती दिली असता, सदर काम 'सिडको' चे असल्यामुळे सिडको अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे त्यांनी सांगितले. दरम्यान, 'सिडको' चे विभागीय कार्यालय कळंबोली येथे असल्यामुळे तसेच परिसरात अधिकारी फिरकत नसल्यामुळे कोणत्या अधिकाऱ्याकडे संपर्क साधावा? असा प्रश्न तळोजा फेज-२ मधील नागरिकांना पडला आहे.

चोरांचा सुळसुळाट

पनवेल : पनवेल तालुक्यातील तळोजा गावात चोरांचा सुळसुळाट झाला असून एकाच परिसरातील दोन घरात या चोरट्यांनी घरफोडी करून ९५ हजार रुपयांची रोख रक्कम लंपास केली.

तळोजा मन्नन कॉलनी येथील शाहाबाज रहेमान पटेल यांच्या घरात घुसून अज्ञात चोरट्याने १५ हजाराची रोख रक्कम चोरून नेली. तसेच त्याच परिसरातील रियाज ईकबाल शेख यांच्या बंद घरातून ८० हजार व २ हजार रुपये किंमतीचा एच.पी. गॅस कंपनीचा दोन सिलेंडरच्या टाक्या असा एकूण ८२ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला. याबाबत तळोजा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

त्रिंबक मुंबईकर यांना पत्नीशोक

। चिरनेर । वार्ताहर ।

उरण तालुक्यातील वेश्वी येथील रुक्मिणी त्रिंबक मुंबईकर यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले आहे. निधनासमयी त्यांचे वय ८४ वर्षाचे होते. शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा उरण पंचायत समितीचे माजी सदस्य, तसेच वेश्वी ग्रामपंचायतीचे माजी सरपंच त्रिंबक मुंबईकर यांच्या त्या पत्नी होत्या. त्यांच्या पश्चात चार पुत्र, दोन विवाहित कन्या, सुना, जावई व नातवंडे असा आप्त परिवार आहे. त्यांचा उत्तरकार्यविधी १४ जुलै रोजी वेश्वी येथील राहत्या घरी दुपारी ठीक बारा वाजता होणार असल्याची माहिती मुंबईकर परिवारातर्फे देण्यात आली.

अतिक्रमण हटविण्यासाठी तहसीलदारांना निवेदन

। म्हसळा । वार्ताहर ।

सकलप, खारगावखुर्द ग्रामपंचायत हद्दीतील दिघी रोड येथे समुद्राकडे जाणारा रस्ता खासगी जमीन मालकाने बांधकाम करून बंद केला असल्याने तो मोकळा करून मिळण्यासाठी सकलप, खारगावखुर्द गावातील शिष्टमंडळाने म्हसळा तहसीलदारांना निवेदन देण्यात आले आहे. येथे हिंदु समाज परंपरे नुसार पूर्वापार नारळी पौर्णिमेला शासकीय इतमामात समुद्राला नारळ अर्पण करून पूजापाठ केली जाते तसेच गणेश मुर्ती विसर्जन करतात असे असताना विसर्जन घाटावर माती भराव करून व पक्के बांधकाम करुन कायम बंद केला असल्याचे ग्रामस्थांनी तहसीलदारांच्या निदर्शनास आणून दिले आहे. याबाबत म्हसळ्याच्या तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. यावेळी माजी सभापती महादेव पाटील, सुरेश कुडेकर, अनंत नाक्ती, महादेव म्हात्रे, काशिनाथ पाटील, कृष्णा म्हात्रे, कानु लोणशीकर, संजय लोणशीकर, सुबोध पाटील, बाबु खोत, योगेश मेंदाडकर आदी मान्यवर, ग्रामस्थ उपस्थित होते. योग्य ती चौकशी करुन कारवाई केली जाईल असे आश्वासन तहसीलदारांनी शिष्टमंडळाला दिले आहे.

सोनसाखळी चोरांची दोन ठिकाणी चोरी

। पनवेल । वार्ताहर ।

चैन स्नॅचींग करणाऱ्या लुटारूंनी खारघरमध्ये अवघ्या दहा मिनिटांमध्ये दोघांच्या अंगावरील सुमारे ९२ हजार रुपये किंमतीचे दागिने लुटून पलायन केल्याची घटना घडली आहे. खारघर पोलिसांनी या लुटारुंविरोधात जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

खारघर सेक्टर ७ मध्ये राहणाऱ्या विमल झरेकर (६५) ही महिला नेहमीप्रमाणे आपल्या सोसायटी लगतच्या गार्डनमधून वॉकींगकरून घरी परतत होती. समोरुन दुचाकीवरुन आलेल्या दोघांनी त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र खेचले. यावेळी ३७ हजार रुपये किमतीचे अर्धे मंगळसूत्र लुटारुंच्या हाती लागले, यावेळी विमल झरेकर यांनी आरडाओरड केली. तोपर्यंत लुटारुंनी तिथून पलायन केले. त्यानंतर काही वेळातच लुटारूंनी खारघर परिसरात चालत जाणाऱ्या हर्ष मनोज डिंग्रा (१९) या तरुणाच्या गळ्यातील आठ ग्रॅम वजनाचे ५५ हजार रुपये किंमतीची सोन्याची चेन खेचून पळ काढला. विमल झरेकर आणि हर्ष डिंग्रा यांनी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. याप्रकरणी खारघर पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपासाला सुरुवात केली आहे.

तलावात बुडून मृत्यू

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल तालुक्यातील कोळवाडी येथील तलावात आर्यन संजय भालेराव (वय १४) या मुलाचा बुडून मृत्यू झाला आहे. या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. कोळवाडी येथील आर्यन संजय भालेराव हा मावशी त्याच्या मुलगा अश्विन मोरे आणि प्रदीप थापा यांच्यासोबत पोहण्यासाठी गावाजवळील तळ्यात गेले होते. यावेळी पाण्यात बुडून आर्यन याचा मृत्यू झाला. या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

मुरूड येथे सलग ३ दिवस पावसाने गारंबी धरण भरले आहे. हिरवाईत नटलेल्या काळ्या दगडावरून वाहणाऱ्या पाण्याची मजा घेण्यासाठी रविवारी सुट्टी पर्यटकांच्या रांगा लागतील. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

■ नागाव मधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफ ची आवश्यकता आहे. १.हाऊस किपर २.वेटर २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी संपर्क साधावा-(व्हॉटसॲप वर मेसेज करावा) ८४०८८२९५५५/७८७५८६६५५५

■ Ku Koo Ch Ku Poultry Farm : Certified Electrician- पगार : १५,०००/- महिना, शॉप : मुलगा १२ वी पास- पगार : १०,०००/- महिना, सुरक्षा रक्षक : पगार १०,०००/- महिना, निजामपूर माणगाव ऑफिसर : १५ वी + कॉम्प्युटर मुलगा/मुलगी- पगार : सर्वसाधारण १५,००० प्रती महिना. संपर्क : अनुष्का राऊत ७७९८८८३८६४

■ वडखळ येथे cng पंपासाठी त्वरित cng भरणारी मुले पाहिजेत. संपर्क : ९२८४३७६९८२

■ वडखळ येथे नामांकित कंपनीच्या पेट्रोलपंपामध्ये पेट्रोल व डिझेल भरण्यासाठी त्वरित मुले पाहिजेत. संपर्क : ९२८४३७६९८२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

नेरळ-बोपेले रस्त्यावर खड्डेच खड्डे

। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत तालुक्यातील नेरळ कळंब रस्त्यावरील साई मंदिर ते बोपेले गावाकडे जाणारा रस्ता खड्ड्यात हरवला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने या रस्त्यावर मंजूर असलेले काम वेळेत सुरू केले नाही आणि त्यामुळे खड्डेमय रस्ता कायम आहे. दरम्यान याच रस्त्याच्याकडेने कोल्हारे ग्रामपंचायतकासून पाईप लाईन टाकण्यासाठी खोदकाम केले आहे आणि त्यामुळे हा रस्ता वाहतुकीस धोकादायक बनला आहे.

धामोते कोल्हारे येथील साई मंदिर नाका येथून तळवडे पिंपलोळी आणि पुढे गुडवण सुगवे असा रस्ता जात असतो. या रस्त्यावर तीन टप्प्यात डांबरीकरण आणि काँक्रिट करणाची कामे शासनाने मंजूर केली आहेत. या कामांचे भूमिपूजन आ. महेंद्र थोरवे यांनी केले होते आणि त्या रस्त्यावरील बोपेले पासून काळेवाडी पर्यंत बीबीएम डांबरीकरण पूर्ण झाले असून डांबरीकरण होणे बाकी आहे. तर काळेवाडी पासून लोभेवाडी पर्यंत रस्त्यावर डांबरीकरण दोन टप्प्यांत पूर्ण झाले आहे.

मात्र याच रस्त्याचा भाग असलेल्या साई मंदिर ते बोपेले गाव या रस्त्यावर गेल्या अनेक वर्षे डांबरीकरण झाले नाही आणि त्यामुळे या रस्त्यावरून प्रवास करणे अवघड होऊन बसले आहे. त्यात पावसाळ्यात तर या रस्त्यावर खड्डेच खड्डे आढळून येत असून त्यामुळे वाहनचालक यांना प्रवास करणे कठीण होऊन बसले आहे. या रस्त्यावरील खड्डे हे कोणत्याही वाहनांच्या ये जा करण्याने आजूबाजूने चालणारे वाटसरू यांच्या अंगावर चिखलाचे पाणी उडत असते. त्यामुळे या रस्त्याने प्रवास करताना वाहनचालकांना त्रास्त होत आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने पाईप लाईन टाकण्यासाठी खोदलेले खड्डे हे पुन्हा सुस्थितीत तयार करण्यासाठी कोल्हारे ग्रामपंचायतीला निर्देश द्यावेत आणि वाहन चालक यांचा प्रवास सुखकर करावा अशी मागणी नेरळ एसटी स्टँड येथील जय मल्हार रिक्षा संघटनेचे स्टँड प्रमुख भगवान जामघरे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केली आहे.

संस्कार धाममध्ये वक्तृत्व स्पर्धा

। महाड। प्रतिनिधी।

महाड तालुक्यातील बिरवाडी येथील संस्कार धाम विद्यालय माध्यमिक शाळेमध्ये गुरुपौर्णिमा उत्साही वातावरणात साजरी करण्यात आली. याप्रसंगी विद्यालयाच्या प्रा. भारती कदम यांनी वेदव्यास यांच्या प्रतिमेचे पूजन व सरस्वतीचे पूजन केले.

यावेळी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते, यामध्ये ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत भक्ती चौधरी प्रथम, नागदे अन्वेष द्वितीय, गायकवाड पूजा तृतीय क्रमांक पटकावला. कार्यक्रमाची तयारी दिलीप सकपाळ यांनी केली. या कार्यक्रमाला नितीन ढेपे, नैना परब, सायली बनकर, सुशील पार्टी, राम काळे हे उपस्थित होते.

पळसदरीत गुरुपौर्णिमा साजरी

। नेरळ । वार्ताहर ।

श्री स्वामी समर्थ मठ पळसदरी येथे गुरुपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी अन्नदान समितीचे वतीने एव्हरेस्टवीर संतोष दगडेसह लेखक संजय वेंगुर्लेकर , क्रीडापटू अमृता भगत यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे नियोजन विक्रांत दरेकर, ॲड. राजेंद्र निगुडकर, राजू पोतदार, दिनेश अडावदकर, ॲड. प्रदिप सुर्वे, अशोक शितोळे, ईच्छांत कांबळी, सुभाष ठकेकर, वत्सला वांजळे, अभि दरेकर, सचिन दरेकर, मंगेश शिंदे, सुभाष पाटील, संजय मालगुंडकर, राजन मेहता, दादू दरेकर, सदानंद लोखंडे, दिलीप पांडे, प्रमोद दानवे, यांनी केले.

कर्नाळा नागरी सहकारी बँक लि., पनवेल
RGD/(PNL)/BNK/(0)/110/95-96 तारीख: 2/3/96
रतन मार्केट, पहिला मजला, टपाल नाका, उरण रोड,
पनवेल 410206, जि. रायगड (M.S.) इंडिया.
दूरध्वनी: 2745 9111/2746 2700, फॅक्स-2746 2700

कर्नाळा नागरी सहकारी बँक लि.पनवेल (अवसायनात)
-: ठेवीदारांना जाहिर आवाहन :-

कर्नाळा नागरी सहकारी बँकेच्या (DICGC) कडून रू. ५.०० लाखापर्यंत ठेव विमा संरक्षित रक्कम परत करण्यासाठी मंजुर झालेल्या ३८६३९ ठेवीदारांपैकी १५५७० ठेवीदारांनी अद्यापही KYC कागदपत्रे (पॅनकार्ड, आधारकार्ड, फोटो व इतर बँकेचा कॅन्सल चेक किंवा पासबुकची दुय्यम प्रत) बँकेत जमा केली नाहीत. तसेच मंजुर न झालेले १२१०५ ठेवीदारांनीही अद्याप बँकेकडे KYC कागदपत्रे जमा केली नाहीत. त्यामुळे त्यांचे रू.५.०० लाखापर्यंतचे क्लेम मंजूरीसाठी DICGC कडे पाठविता आले नाहीत अशा ठेवीदारांना जाहिर आवाहन आहे की, त्यांनी वर नमूद KYC कागदपत्रे लवकरात लवकर बँकेच्या मुख्य कार्यालयात जमा करावी. तसेच याबाबतच्या यादया संबंधीत गावाचे ग्रामपंचायत कार्यालयाचे नोटीस बोर्डावर डकविणेत आलेल्या आहेत. त्यांनी KYC कागदपत्रे सादर करावीत. अन्यथा होणा-या परिणामास अवसायक जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

स्थळ:- पनवेल
दिनांक :- ०४/०७/२०२३

बालाजी कटकदौंड अवसायक
कर्नाळा नागरी सहकारी बँक लि.पनवेल (अवसायनात)
मुख्य कार्यालय- रतन मार्केट, पहिला मजला,टपाल नाका, उरण रोड, पनवेल - ४१०२०६

जाहीर नोटीस दि. ०४/०७/२०२३

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सूचित करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे तमनाथ, ता. कर्जत, जि. रायगड येथील

सर्व्हे क्र.	हिस्सा क्र.	क्षेत्रफळ	आकार
४४	१/अ/१	०-९९-४० पैकी मे. अक्षय डेव्हलपर्स तर्फे भागीदार वगैरे यांनी विकत दिलेले क्षेत्र ०-२१-२५	०-९७

ची शेतजमीन मिळकत विद्यमान मालक यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करावयाची ठरविलेले आहे. तसा उभयतांमध्ये व्यवहार घडून आलेला आहे.

तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणापावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात. सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त शेतजमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही व असल्यास ते जाणीवपूर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडून दिलेले आहेत. असे समजून कायदेशीर बाबींची पूर्तता करून आमचे अशिल उपरोक्त शेतजमीन मिळकती संदर्भातचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहीर नोटीसने तमान जनतेने नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

ॲड. प्रमोद नथुराम सुर्वे
रा. 'मातोश्री' निवास आवळस, ता. कर्जत, जि. रायगड
भ्रमणध्वनी क्र. ०९८८१५७९५५५

प्रो.जमा. रू. ५०/- अर्जदारतर्फे ॲड. ओमकार कदम

जाहीर नोटीस

अलिबाग येथील मे. मुख्य न्यायदंडाधिकारी सो. रायगड यांचे न्यायालयात

क्रि.चौ.अर्ज नं. १३७/२०२३

श्री. सखाराम जोमा पाटील ...**अर्जदार**
विरूद्ध
ग्रुप ग्रामपंचायत श्रीगाव ...**सामनेवाला**
ता. अलिबाग, जि. रायगड

या जाहीर नोटीशीने तमाम जनतेस कळविण्यात येते की,

अर्जदार यांची आई कै. यमुनाबाई जोमा पाटील हिचे दिनांक ३०/०३/२०१९ रोजी मौजे मेढेखार, ता. अलिबाग, जि. रायगड येथे निधन झालेले आहे व त्याची नोंद ग्रुप ग्रामपंचायत श्रीगाव, ता. अलिबाग यांच्या कार्यालयीन दप्तरी सन २०१९ साली नोंदविण्याचे अनावधानाने व नजरचुकीने राहून गेलेले आहे. सदरच्या मृत्यूची नोंद होण्याकरीता आदेश मिळविण्याकरीता मे. कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही तक्रार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि. २७/७/२०२३ रोजी पर्यंत मे. न्यायालयात हजर राहून आपली तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक २१/६/२०२३ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
कनिष्ठ लिपिक
मुख्य न्यायदंडाधिकारी सो.
अलिबाग-रायगड

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहाय्यक अधिक्षक
मुख्य न्यायदंडाधिकारी सो.
अलिबाग-रायगड

जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे सहाण, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत श्री. संजय महादेव भगत, राहणार विद्यानगर, चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहेत. सदरील शेतजमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. संजय महादेव भगत, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असलेबाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतींमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट

मौजे	भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर)	आकार (रु.पैसे)
सहाण, ता.अलिबाग	१२५/२	०-१३-५५ ०-०२-०० पो.ख. ०-१५-५५ एकूण	३-४८

सदर मिळकतीपैकी ०-१२-०५ आर्स शेतजमिन मिळकत.
अलिबाग,
दिनांक : ५/०७/२०२३.

सही/-
(ॲड.निवास ना.पाटील)
श्री.क्षेत्र,सहाण,
ता.अलिबाग, जि.रायगड
खरेदीदाराचे वकील

अलिबाग नगरपरिषद
आरोग्य विभाग
ई-निविदा सूचना सन २०२३-२४

अलिबाग नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाकडील ई-निविदा सूचनेमध्ये अलिबाग नगरपालिकेचे गॅसवर चालणारी शवदाहिनी देखभाल दुरूस्ती करणेबाबत ई निविदा मागविण्यात येत आहेत. सविस्तर ई निविदा सूचना शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ६/०७/२०२३ पासून उपलब्ध होईल. सदर कामाच्या निविदा प्रक्रियेत कोणताही बदल/सुधारणा असल्यास वरील संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत येईल.

सही/-
मुख्याधिकारी
अलिबाग नगरपरिषद

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक

सिडको
शहरांचे शिल्पकार

जाहीर सूचना
(हक्कसोड पत्राबाबत)

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषांगिक कामामुळे स्थलांतरीत होणाऱ्या कोंबडभुजे येथील गावठाणाच्या बाहेरील जमिनीवरील बांधकाम क्र. KB-३९३, A हे **रुपेश शिवदास भगत** यांचेकडून संपादित झालेली आहे. सदर बांधकामधारकांना **भूखंड क्र. ४९, सेक्टर-२५A, क्षेत्र ३३०.०० चौ.मी.** चे वाटपपत्र देण्यात आलेले आहे.

गावाचे नाव/ संचिका क्र.	बांधकाम क्र.	सहबांधकामधारकाचे नाव	बांधकामाचे छपराखालील क्षेत्र (चौ.मी.)	वाटपित भूखंडाचा तपशील			
				नोड	सेक्टर क्र.	भूखंड क्र.	क्षेत्र (चौ. मी.)
कोंबडभुजे	KB-३९३, A	कृष्णाबाई शिवदास भगत	१०६.९२	पुष्पक (वहाळ)	२५A	४९	३३० चौ.मी. पैकी ११० चौ.मी.

कृष्णाबाई शिवदास भगत यांनी **वृषाली रुपेश भगत, कु. मल्हार रुपेश भगत (आ.प.क. आई वृषाली रुपेश भगत)** यांना इरादित **भूखंड क्र. ४९ सेक्टर २५A, क्षेत्र ३३० चौ.मी.** पुष्पक नोड (वहाळ) पैकी ११० चौ.मी. हिस्स्याचे हक्कसोड पत्र सह दुय्यम निबंधक वर्ग-२ (पनवेल-५) येथील पवल ५-१८६३०-२०२२, पावती क्र. २०२९३ दिनांक २१.११.२०२२ रोजी यांच्याकडे नोंदणीकृत करण्यात आलेले आहे व ते सादर केले आहे.

उपरोक्त हक्कसोडपत्राप्रमाणे भूखंड क्र. ४९ सेक्टर २५A, क्षेत्र ३३० चौ.मी. यामधील **कृष्णाबाई शिवदास भगत** त्यांचा हिस्सा **वृषाली रुपेश भगत, कु. मल्हार रुपेश भगत (आ.प.क. आई वृषाली रुपेश भगत)** यांस देण्यास संमती दिली आहे व तसेच सह दुय्यम निबंधक वर्ग-२ (पनवेल-५) यांनी **वृषाली रुपेश भगत, कु. मल्हार रुपेश भगत (आ.प.क. आई वृषाली रुपेश भगत)** यांच्या लाभात हक्कसोड बाबत पत्र सादर केलेले आहे.

उपरोक्त हक्कसोडपत्र विचारात घेऊन, ज्यांनी वाटपित भूखंडामधील हक्क व हितसंबंध सोडून दिलेले आहेत. त्यांची नावे वगळून ज्यांना जे हक्क प्रदान करण्यात आलेले आहेत. अशा व्यक्तीच्या नावे सिडकोकडून भूखंडाचे करारनामा करुन भूखंडाचा ताबा आजच्या तारखेपासून ३० दिवसांपर्यंत कोणत्याही दिवशी देण्याचे प्रस्तावित आहे.

वरील वाटपित केलेल्या भूखंडा संदर्भात वर नमूद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभात हक्क व अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार या पुढे लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत / तक्रार असेल तर त्यांनी सदर हरकत/तक्रारीच्या समर्थनार्थ सक्षम न्यायालयाचे आवश्यक ते आदेश प्राप्त करून सदर आदेशाच्या साक्षांकित प्रतींसह **अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (विमानतळ) तळ मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई** यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून **तीस दिवसांच्या** आत सर्व पुरावे व योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमूद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत/तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यात येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही असे समजुन वरील वाटपित भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (विमानतळ)

www.cidco.maharashtra.gov.in
CIN - U99999 MH 1970 SGC-014574
सिडको/जनसंपर्क/१८०/२०२३-२४

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेती मिळकत असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. प्रशांत विठ्ठल पाटील, रा.ए-१९, प्रियुश विल्ला चेद्दा रोड, जोशी स्कूलजवळ सारस्वत कॉलनी, डोंबिवली (पू.) कल्याण, २) श्री. पराग विठ्ठल पाटील, रा. न्यू आसरा, ए/१९, गुरूमंदिर रोड, सारस्वत कॉलनी, डोंबिवली (पू.), ३) प्रतिभा सदानंद माहिमकर, रा.ए-१०३/सागर ज्योती बिल्डींग, पद्माकर कॉलनी, गुजराती कॉलेजजवळ, ठाकूर्ली (पू.), ४) प्रीती देवेंद्र राणे रा. बोरी, पानसरे आळी, पो. ता. उरण, जि. रायगड, यांच्याकडून सदरची मिळकत कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरवले असून सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.चौ.मी.)	आकार रु.पैसे
वरसोली ता. अलिबाग	१०४/१	०.०७.६०	२.४४

सदर वर नमूद केलेली शेती मिळकत ही या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (७) सात दिवसांचे आत आणून द्याव्यात. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व त्या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलास सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख ०५/०७/२०२३

सही/-
ॲड. शैलेश प्रभाकर पाटील
शॉप नं. ४, दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर
पो. अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे-सहाण, ता.अलिबाग जि.रायगड येथील खालील क्षेत्राचे वर्णनाची बागायत जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक सौ.जयश्री गणपत बानकर यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्र व उपविभाग	क्षेत्र (हे.आर)	आकार (रू.पै.)
सहाण ता. अलिबाग	२००	००.०४.८० पो.ख.००.००.८० एकूण ००-०५-६०	०१.३१

तसेच सदर मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

वर वर्णन केल्याप्रमाणे क्षेत्राची जमिन मिळकती या त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीं वर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री,गहाण दान, भाडेपट्टा, विक्रीचाकरार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरीहक्क या अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत आल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७(सात) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून द्यावीत, मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकती विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काच्या आहेत व त्यावर अन्य कुणाचा ही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०५/०७/२०२३

ॲड. राहुल रमेश नाईक
मु.नागांव, ता.अलिबाग
मोबा. क्र. ९९२२७९८५२८

Nagothane Education Society Nagothane Tal Roha Dist Raigad

WANTED

Applications are Invited for the following post in our Aided **N.E.S. Urdu High School & Jr. College Nagothane Tal Roha Dist Raigad For Academic Year 2023-2024**

For High School

Sr.No.	Qualification	class	Subject	No of Post
1	B.A./M.A.B.Ed.	9 th-10th	English	01
2	B.A.B.Ed	9 th- 10th	Social	01
3	B.Sc. B.Ed.	6th -8 th	Science (TET)	01

For Jr.College

Sr.No.	Qualification	class	Subject	No of Post
1	M.A.B.Ed.	11 th-12th	English Economics	01
2	M.Com B.Ed	11 th-12th	B.K S.P O.C	01
3	M.A.M.P.Ed	11 th-12th	Hindi	Part Time

For the above mentioned post Candidate Should be Urdu Knowing. Interested Candidate apply immediately in the own handwriting with name address mobile no & recent passport size photo graph within 10 days.
Adress: N.E.S. Urdu High School At Post Nagothene Tal. Roha Dist Raigad Pin 402106 Email ID nesurduhighschool2018@gmail.com

Date : 5-7-2023

Sd/-
Chairman Secretary
Nagothane Education Society
Nagothane - Raigad

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

E-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered electrical contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender Specification. **Tender Fee:** Rs. 500/- + GST.

Sr. No.	Particulars	Description
1	Tender No. & Name of Tender	**RFx No. 7000027872** **Tender No.:** EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-35/2023-2024. RFx E-Tender for Work of repairing of 22/33kV Current Transformer/Potential Transformer at various Substations under EHV (O&M) Division, Panvel. **Tender Amount Limited to:** Rs. 5,00,000/- **EMD Amount:** Rs. 5,000/-
2	Online Downloading of the RFx	06.07.2023, 17:00 Hrs to 13.07.2023, 23:59 Hrs.
3	Online Submission of the RFx	On or Before 13.07.2023 up to 23:59 Hrs.
4	Online Opening of the Techno-Commercial RFx	14.07.2023 at 11:00 Hrs (if Possible)

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
Contact Person: The Add'l Executive Engineer, (O): 022-2746 5410.
Note: All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
Executive Engineer
EHV (O&M) Dn., Panvel

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

E-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed and registered contractors on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender Specification.

Sr. No.	Tender No. EE/400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/	Description	Estimated Cost	Submission Date
1	e-Tender-17/23-24/ **RFx No. 7000027878**	Work of Retrofitting (Installation, Testing & Commissioning) of ZIV make Distance and backup relay at 400 kV Nagothane s/s under 400 kV Nagothane div. under EHV O&M Circle, Panvel.	Rs. 8,20,100/-	12.07.2023 up to 23:59 Hrs.

EMD 1% of Estimate Cost & Tender Fee: Rs. 500/- + GST. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
Contact Person: Mitesh Goyal (DY. EE) Mob No. 9461456635
e-mail ID: **ee7230@mahatransco.in**
Note: All eligible Suppliers/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
Executive Engineer
400kV R.S. (O&M) Dn., Nagothane

ॲड. एस.वाय. बारटक्के
अर्जदारांचे वकील

जाहीर नोटीस

अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर सो. यांचे न्यायालयात

दिवाणी चौकशी अर्ज क्र. ७४/२०२३
नि. ८

श्री. सुनील लक्ष्मण आठवले ...**अर्जदार**
विरुद्ध
श्री. मोहन लक्ष्मण आठवले ...**सामनेवाला**

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, कै. मंगला लक्ष्मण आठवले या अर्जदार व सामनेवाला यांची आई अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. कै. मंगला लक्ष्मण आठवले हे दिनांक २१.०८.२०१३ रोजी मौजे नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथे मयत झाले. अर्जदार यांचे शिवाय कै. मंगला लक्ष्मण आठवले यांस अन्य कोणीही वारस नाहीत. कै. मंगला लक्ष्मण आठवले यांचे नावे मौजे नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील ग्रुप ग्रामपंचायत नागाव मालमत्ता क्र. १७०९, क्षेत्र ८०१ चौरस फुट या वर्णनाची मिळकती संदर्भात कै. मंगला लक्ष्मण आठवले यांचा असलेला हिस्सा या संदर्भात अर्जदार यांचे नावे वारस दाखला/हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, अर्जदार यांचे नावे असा वारस दाखला देणेस कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर आपले नेमलेले प्रतिनिधी वा वकिल यांचेमार्फत या दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अलिबाग यांचे न्यायालयात दिनांक २५.०७.२०२३ रोजी हजर रहावे. आपण हजर न राहिल्यास एकतर्फी काम चालेल, याची नोंद घ्यावी. आज दिनांक २८.०६.२०२३ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क. लिपीक
दिवाणी न्यायाधीश व स्तर, अलिबाग

कोर्टाचा शिक्का

सही/-
अधीक्षक
दिवाणी न्यायाधीश व. स्तर अलिबाग

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे पाझर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्र.व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु.पै.)
पाझर ता. अलिबाग	२५०/१	जिरायत ०-१५-६० पो.ख. ०-००-७० एकूण ०-१९-३०	४.३३

वर नमूद जमीन मिळकतीपैकी विक्रेता सौ. माधुरी मोहन घरत यांचे हिश्श्याचे अविभक्त क्षेत्र तसेच सदर क्षेत्रावर असणारी ग्रुप ग्रामपंचायत मालमत्ता क्र. ३८४७ आणि मालमत्ता क्र. ३५५७ या नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत विद्यमान मालक सौ. माधुरी मोहन घरत यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभात सोडून दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०५/०७/२०२३

ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे
मु. बुरूमखाण, पो. वरसोली,
ता. अलिबाग, जि. रायगड
मोबा क्र. ९९२२७०७०१२

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे-सहाण, ता.अलिबाग जि.रायगड येथील खालील क्षेत्राचे वर्णनाची बागायत जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १)श्री.संजय वसंत आठवले व २)सौ.शलाका संजय आठवले यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्र व उपविभाग	क्षेत्र (हे.आर)	आकार (रू.पै.)
सहाण ता. अलिबाग	११९	००.१३.२० पो.ख.००.०१.८० एकूण ००-१५-००	०२.३९

तसेच सदर मिळकतीवर असणारे सहाण ग्रामपंचायत मिळकत क्र. ५८९ क्षेत्र ८० चौ.फुट. या नोटीसीचा विषय आहे.

वर वर्णन केल्याप्रमाणे क्षेत्राची जमिन मिळकती या त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीं वर अ

निवडक

फोगटच्या अडचणी वाढल्या

नवी दिल्ली : तीन वेळची राष्ट्रकुल विजेती विनेश फोगटच्या अडचणी वाढल्या आहे, तिला हंगेरीला जाण्यासाठी व्हिसा मिळू शकला नाही. कझाकस्तानमधील बिश्केक येथील प्रशिक्षण शिबिरात सहभागी होण्यासाठी विनेश शनिवारी निघणार होती, परंतु तिचा पासपोर्ट अद्याप हंगेरियन दूतावासात अडकला आहे. विनेशकडे ई-व्हिसा आहे. या प्रकरणाची माहिती क्रीडा मंत्रालय तसेच परराष्ट्र मंत्रालयाला देण्यात आली.

कार्लोसची विजयी वाटचाल

लंडन : विम्बल्डन टेनिस स्पर्धेच्या पुरुष एकेरीत अव्वल मानांकित कार्लोस अल्काराझ व महिला एकेरीतील गतविजेती एलेना रायबाकिना यांनी प्रतिस्पर्ध्यांना हरवत पुढल्या फेरीत वाटचाल केली. स्पेनच्या कार्लोस अल्काराझ याने फ्रान्सच्या जेरेमी चार्डीवर सहज विजय नोंदवला. ग्रँडस्लॅम जेतेपद पटकावण्यासाठी प्रबळ दावेदारांपैकी एक असलेल्या अल्काराझ याने चार्डीचे आव्हान सरळ तीन सेटमध्ये संपुष्टात आणले.

फेडरर झाला गायक

लंडन : टेनिसस्टार रॉजर फेडरर टेनिसमध्ये सक्रिय नाही. असं असलं तरीही तो या खेळाशी मात्र आजही जोडला गेला आहे. फेडरर नुकताच एका जगप्रसिद्ध बँडमधूनही गाताना दिसला. झुरिक येथे रविवारी एका कॉन्सर्टदरम्यान बँडच्या लीड वोकलिस्ट अर्थात मुख्य गायक क्रिस मार्टिन याच्यासोबत फेडरर स्टेजवर गाणं गाताना दिसला. त्याच्या या नव्या रुपाचं चाहत्यांनी जोरदारपणे स्वागतही केलेले आहे.

कर्णधारपदाचा राजीनामा

हरारे : भारतात होणाऱ्या क्रिकेटच्या महाकुंभासाठी आयर्लंडचा क्रिकेट संघ पात्र ठरू शकला नाही. याच कारणामुळे अँड्रयू बालबर्नीने आयर्लंडच्या कर्णधारपदावरून पायउतार होण्याचा निर्णय घेतला आहे. आयर्लंड क्रिकेटने याला दुजोरा दिला आहे. बालबिर्नीने २०१९ च्या अखेरीस संघाचे कर्णधारपद स्वीकारले. त्याने ४ कसोटी, ३३ एकदिवसीय आणि ५२ टी-२० सामन्यांमध्ये आयर्लंड संघाचे नेतृत्व केले आहे.

सामन्यात हाणामारी

वॉशिंग्टन : अमेरिकेत सुरू असलेल्या कोन्काकॅफ गोल्ड कप स्पर्धेच्या एका सामन्यात धक्कादायक घटना घडली आहे. कतार विरुद्ध मेक्सिको या सामन्यादरम्यान, मेक्सिकोच्या एका चाहत्यावर चाकूहल्ला झाला आहे. गोल्ड कप स्पर्धेदरम्यान स्टँड्समध्ये बसलेल्या चाहत्यांमध्ये मोठा राडा सुरू झाला. त्याचवेळी एका चाहत्यावर चाकूहल्ला झाल्यानंतर मोठा गोंधळ उडाला. चाहत्याच्या छातीवर वार झाला आहे.

भारतीय संघाच्या बांधणीचे लक्ष्य

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।
बीसीसीआयला अखेर एक सक्षम आणि टी २० क्रिकेट खेळलेला निवड समिती अध्यक्ष मिळाला आहे. माजी अष्टपैलू खेळाडू अजित आगरकरची भारतीय वरिष्ठ पुरूष संघाचे निवड समिती अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली आहे. भारतीय संघ अनेक क्रिकेट फॉरमॅटमध्ये संक्रमणाच्या काळाचा सामना करणार आहे. अशा स्थितीत अजित आगरकर निवडसमिती अध्यक्ष झाला आहे. त्यामुळे अजित आगरकर अध्यक्षपद भूषवत असलेल्या निवडसमितीवर एक मोठी आणि ऐतिहासिक जबाबदारी आहे. संघ निवडीची मुख्य किल्ली आता अजित आगरकर यांच्याकडे देण्यात आली आहे.



अजित आगरकरांकडे निवड समितीचे सूत्र

सर्वात महत्वाचे काम म्हणजे भारतात ऑक्टोबर महिन्यात होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषक जिंकून देणारा संघ निवडणे हे असणार आहे. भारताने गेल्या १० वर्षात एकदाही आयसीसी चषक जिंकलेला नाही. २०१३ मध्ये धोनीच्या नेतृत्वाखाली विश्वचषक जिंकला होता.

सध्या टी २० मालिकेदरम्यान विश्रांती घेणाऱ्या रोहित शर्मा आणि विराट कोहलीला नारळ देण्याचा निर्णय झालाच. तर अजित आगरकरच्या निवडसमितीला हार्दिक पांड्याकडे टी २० संघाचे कर्णधारपद कायमचे देण्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करावे लागले. याचबरोबर रोहित या विश्वचषकानंतर भारतीय संघाचे नेतृत्व करणार की नाही याबाबत देखील निर्णय घ्यावा लागले. रोहितचा उत्तराधिकारी म्हणून हार्दिक पांड्याकडेच वनडे कर्णधारपद द्यायचं की प्रत्येक फॉरमॅटसाठी वेगळा कर्णधार नेमायचं याचाही निर्णय घ्यावा लागेल.

पगारात २०० टक्के वाढ

आगरकर पगारात तब्बल २०० टक्के हाईक घेत निवडसमिती अध्यक्षपदी विराजमान झाला. बीसीसीआयने निवडसमिती अध्यक्षपदाच्या वार्षिक पगारात तब्बल तीनपट वाढ केली. आता अजित आगरकरला १ कोटी नाही तर ३ कोटी रूपये मिळणार आहे. आगरकरने निवडसमिती अध्यक्षाचा पगार तिपटीने वाढवला खरा मात्र त्याच्यावर आता पगाराप्रमाणेच मोठी जबाबदारी असणार आहे.

जुनी खोंड राहणार की जाणार?

भारतीय संघ २०२४ ला टी २० विश्वचषकाला सामोरा जाणार आहे. एकदिवसीय विश्वचषक स्पर्धा झाल्यानंतर भारतीय संघ व्यवस्थापन हे टी २० साठी कंबर कसेल. यावेळी निवडसमितीला भारतीय टी २० संघाचा पारंपरिक चेहरा बदलण्याचे आव्हान असणार आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहलीला शेवटचा टी २० वर्ल्डकप खेळवायचा की त्यांना नाराळ देऊन नवे गडी नवे राज्य म्हणत संघात युवा खेळाडूंना स्थान द्यायचं हे देखील अजित आगरकरच्या निवडसमितीला घ्यावा लागणार आहे.

कसोटी संघातही मोठे बदल

भारतीय कसोटी संघाने सलग दोनवेळा विश्व कसोटीसाठी अंतिम फेरी गाठली. मात्र दोन्ही वेळा भारतीय संघाला ती गदा पटकावण्याचा काही मान मिळाला नाही. आता अजित आगरकरच्या अध्यक्षतेखालील निवडसमितीवर २०२३ ते २०२५ पर्यंतच्या विश्व कसोटी स्पर्धेसाठी भारतीय कसोटी संघ तयार करण्याचे आव्हान असणार आहे. हा संघ तयार करताना संघातील रोहित शर्मा, विराट कोहली, चेतेश्वर पुजारा, अजिंक्य रहाणे या सारख्या वरिष्ठ खेळाडूंचे भवितव्याबाबत देखील निर्णय घ्यावा लागले. विशेष म्हणजे रोहितनंतर संघाचे नेतृत्व कोणाकडे द्यायचे हा देखील मोठा निर्णय घ्यावा लागणार आहे.

विश्वचषक स्पर्धेतून झिम्बाब्वे बाद

। हरारे । वृत्तसंस्था ।

विश्वकरंडक पात्रता फेरीच्या साखळी फेरीत वेस्ट इंडीजला पराभूत करणाऱ्या झिम्बाब्वेला सुपर सिक्स लढतीत स्कॉटलंडकडून पराभवाचा धक्का बसला. या पराभवामुळे आता झिम्बाब्वेचे विश्वकरंडकाच्या मुख्य फेरीत पोहोचण्याचे आव्हान संपुष्टात आले आहे.

स्कॉटलंडला मात्र आता मुख्य फेरीत पोहोचण्याची संधी असणार आहे. सुपर सिक्समधील स्कॉटलंडची अखेरची लढत नेदरलँडविरुद्ध होणार आहे. या लढतीत मोठा पराभव टाळल्यास स्कॉटलंडला मुख्य फेरीत वाटचाल करता येणार आहे.स्कॉटलंडकडून झिम्बाब्वेसमोर २३५ धावांचे आव्हान ठेवण्यात आले. सिकंदर रझा (३४ धावा), रायन बर्ल (८३ धावा) आणि वेस्ली एम. (४० धावा) यांचा अपवाद वगळता झिम्बाब्वेच्या फलंदाजांना स्कॉटलंडच्या गोलंदाजांचे आव्हान परतवून लावता आले नाही. झिम्बाब्वेचा डाव २०३ धावांवरच संपुष्टात आला. ख्रिस सोल याने ३३ धावा देत तीन फलंदाजांना पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. ब्रँडन मॅकमुलन व मायकेल लिस्क यांनी प्रत्येकी दोन मोहरे टिपले.

याआधी स्कॉटलंडने प्रथम फलंदाजी करताना ८ बाद २३४ धावा उभारल्या. ख्रिस्तोफर मॅकब्राईड (२८ धावा), मॅथ्यू क्रॉस (३८ धावा), ब्रँडन मॅकमुलन (३४ धावा), जॉर्ज मुंसी (३१ धावा), मायकेल लिस्क (४८ धावा) यांनी स्कॉटलंडसाठी मोलाच्या धावा उभारल्या. झिम्बाब्वेकडून सीन विल्यम्सने तीन, तर तेंदाई चताराने दोन विकेट घेतल्या.

सुपर सिक्समधील ताजा गुणतक्ता

१) श्रीलंका (८ गुण, १.८१७ सरासरी) २) स्कॉटलंड (६ गुण, ०.२९६ सरासरी). ३) झिम्बाब्वे(६ गुण, -०.०९९ सरासरी). ४) नेदरलँड (४ गुण, ०.०४२ सरासरी). ५) वेस्ट इंडीज (० गुण, -०.५१० सरासरी). ६) ओमान (० गुण, -२.०७२)

सॅफ फुटबॉल अजिंक्यस्पर्धेत भारत विजयी

। बंगळुरू । वृत्तसंस्था ।

सॅफ फुटबॉल अजिंक्यपदाचा अंतिम सामना गतविजेता भारत आणि कुवेत यांच्यात मंगळवारी रात्री खेळला गेला. यजमान भारताने कुवेतचा पेनल्टी शूटआऊटमध्ये ५-४ असा पराभव करत नवव्यांदा सॅफ फुटबॉल स्पर्धा जिंकली. या विजयासह भारतीय संघाने आपली हॅट्रिक पूर्ण केली. या स्पर्धेपूर्वी टीम इंडियाने नेशन्स कप आणि इंटरकॉन्टिनेंटल कप जिंकला आहे. भारतीय संघाच्या विजयानंतर स्टेडियममध्ये जे दृश्य पाहायला मिळाले ते वर्षानुवर्षे चाहत्यांच्या स्मरणात राहील.

एकसुरात गायले वंदे मातरम -

भारत आणि कुवेत यांच्यातील रोमहर्षक अंतिम सामन्याचे साक्षीदार होण्यासाठी सुमारे ३०,००० चाहत्यांनी बंगळुरू येथील कांतेरावा स्टेडियमवर गर्दी केली होती. सामना संपताच सुनील छेत्रीने चाहत्यांना शुभेच्छा देण्यास सुरुवात केली. तेव्हाच संपूर्ण स्टेडियममध्ये वंदे मातरमचे गाणे गुंजू लागले. छेत्री आणि चाहते हे गाणे एकत्र गाताना दिसले.

सुनील छेत्रीने मानले चाहत्यांचे आभार -

सामना संपल्यानंतर सुनील छेत्रीने चाहत्यांचे आभार मानले. या उत्कंठावर्धक सामन्यात बंगळुरूचे स्टेडियम प्रेक्षकांनी खचाखच भरले होत. विजयानंतर छेत्रीने सांगितले की, हा सामना अजिबात सोपा नव्हता पण चाहत्यांनी चाहत्यांनी पाठिंबा देण्यात कोणतीही कसर सोडली नाही. छेत्री बेंगळुरू एफसीकडूनही खेळतो.

गोलकीपर गुरप्रीत सिंग संधूने निर्णायक पेनल्टी वाचवण्यासाठी डायव्हिंग केले. त्यामुळे भारताने शूटआऊटमध्ये कुवेतचा ५-४ असा पराभव करून नवव्यांदा सॅफ फुटबॉल स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. १२० मिनिटांचा खेळ संपेपर्यंत दोन्ही संघ १-१ असे बरोबरीत होते. पेनल्टी शूटआऊटच्या पाच फेऱ्यांनंतरही स्कोअर ४-४ होता, त्यानंतर महेश नोरेमने गोल केला. यानंतर भारताचा गोलरक्षक गुरप्रीत संधूने डायव्हिंग करत खालिद हाजियाचा फटका अडवला.

अंतिम फेरीत कुवेतचा पराभव करून भारताने सॅफ चॅम्पियनशिप स्पर्धेचे विजेतेपद पटकावले आहे. त्याने नवव्यांदा हे विजेतेपद पटकावले आहे. भारत यापूर्वी १९९३, १९९७, १९९९, २००५, २००९, २०११, २०१५ आणि २०२१ मध्ये चॅम्पियन बनला होता. स्पर्धेच्या १४ वर्षांच्या इतिहासात, भारत नऊ वेळा चॅम्पियन म्हणून उदयास आला आहे आणि चार वेळा उपविजेता ठरला.

टे.टे. स्पर्धा : मनीष, पृथ्वेश, वैदेही चमकले

। पनवेल । प्रतिनिधी ।

नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा नुकतीच नवीन पनवेलमध्ये झाली. या स्पर्धेचे पारितोषिक वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेत मनीष सकलानी, पृथ्वेश मंडले, वैदेही ठाकरे यांनी विशेष चमकदार कामगिरी केली.

रसायनीतील मिस्तु केम प्लास्ट लि.चे व्यवस्थापकीय संचालक संजय डेढिया आणि नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळ याच्या संयुक्तविद्यमाने ही टेबल टेनिस स्पर्धा नवीन पनवेल येथील सिडको समाजमंदिरात रंगली. शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेते व रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनचे अध्यक्ष संजय कडू यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या स्पर्धेचे बक्षीस वितरण मिस्तु केम प्लास्ट लि.चे जनरल मॅनेजर एचआर आणि ॲडमिन किशार शेळके आणि मॅनेजर गोपीचंद पाल यांच्या हस्ते झाले.

यावेळी सिंधुदुर्ग जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनचे अध्यक्ष विष्णू कोरगावकर, सचिव हेमंत वालकर उपस्थित होते. स्पर्धेचे चीफ रेफरी म्हणून डी. आर. साळसकर व पराग अंकोलेकर यांनी काम पाहिले.

गटनिहाय पदकविजेते

नवोदित : मुली-रिया ठाकूर नवी मुंबई सुवर्ण, अनुष्का धामणकर नवी मुंबई रौप्य, श्रेया जानकर सीकेटी स्कूल नवीन पनवेल व आराध्या धेंडे नवी मुंबई कांस्य, मुले-यश थाटे नवी मुंबई सुवर्ण, श्लोक पाटील सीकेटी स्कूल नवीन पनवेल रौप्य, आयांश जैन नवी मुंबई व समर्थ कुटे नवी मुंबई कांस्य; ११ वर्षाखालील : मुली-त्रिशा शेखर पावशे डीएव्ही पब्लिक स्कूल नवीन पनवेल सुवर्ण, आराध्या धेंडे नवी मुंबई रौप्य, मुले-नन्वीर सिंग नवी मुंबई सुवर्ण, अद्वीत गुप्ता डीपीएस स्कूल नेरूळ रौप्य; १३ वर्षाखालील : मुली-आर्या दिघे मालवण जि. सिंधुदुर्ग सुवर्ण, अनन्या अजित मराठे डीएव्ही पब्लिक स्कूल नवीन पनवेल रौप्य, मुले-रेयांश शाहू नवी मुंबई सुवर्ण, कार्तिक ठाकरे नवी मुंबई रौप्य; १५ वर्षाखालील : मुली-वैदेही ठाकरे नवी मुंबई सुवर्ण, किशीका धांडे डीएव्ही पब्लिक स्कूल खारघर रौप्य,मुले-हर्षद अनिल कुदाळे सेंट जोसेफ स्कूल नवीन पनवेल सुवर्ण, रेयांश शाहू नवी मुंबई रौप्य; १७ वर्षाखालील : मुली- वैदेही ठाकरे नवी मुंबई सुवर्ण, किशीका धांडे डीएव्ही पब्लिक स्कूल खारघर रौप्य; मुले-इशांत वेंगुर्लेकर मालवण जि. सिंधुदुर्ग सुवर्ण, हर्ष खत्री पेण रौप्य;

१९ वर्षाखालील : मुले-अनिशा अमरिश पात्रा डीएव्ही पब्लिक स्कूल खारघर सुवर्ण, विवेक पाल नवी मुंबई रौप्य; पुरुष एकेरी पृथ्वेश मंडले नवीन पनवेल सुवर्ण, मैत्रेय रौप्य; पुरुष दुहेरी : पृथ्वेश मंडले व रिषब साळसकर नवीन पनवेल सुवर्ण, मनीश सकलानी व सर्वेश दहीबावकर नवी मुंबई रौप्य; वरिष्ठ गट पुरुष : मनीश सकलानी नवी मुंबई सुवर्ण, पॉल डिमेलो नवी मुंबई रौप्य.

विश्वचषकानंतर विराट, रोहितला नारळ?

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

विश्वकरंडकानंतर भारतीय संघातील वरिष्ठ खेळाडूंची चर्चा करून त्यांना क्रिकेटच्या एका प्रकारामधून निवृत्त होण्यास सांगण्यात येण्याची शक्यता आहे. बीसीसीआयच्या सूत्रांकडून ही माहिती देण्यात आली आहे. प्रसारमाध्यमांमधून हे वृत्त समोर आले आहे. वरिष्ठ खेळाडूंच्या यादीत विराट कोहली व रोहित शर्मा या दिग्गज क्रिकेटपटूंचाही समावेश आहे.

बीसीसीआयच्या सूत्रांकडून पुढे सांगण्यात आले की, भारतातील एकदिवसीय विश्वकरंडक आटोपल्यानंतर टी-२० क्रिकेटकडे लक्ष देण्यात येणार आहे. २००७ नंतर भारताने एकदाही टी-२० विश्वकरंडक पटकावलेला नाही. भारतातील आयपीएल स्पर्धेत युवा खेळाडू चमकत असतात. त्यानंतरही भारताला टी-२० क्रिकेट विश्वकरंडक जिंकता आलेला नाही. ही बाब खटकणारी आहे. अखिल भारतीय राष्ट्रीय निवड समिती योजना आखणार असून त्याची अंमलबजावणी एकदिवसीय विश्वकरंडकानंतर करण्यात येईल, असेही त्यांच्याकडून स्पष्ट करण्यात आले. भारतीय संघातील काही वरिष्ठ खेळाडू रडारवर असणार आहेत. रोहित शर्मा, विराट कोहली, रवीचंद्रन अश्विन, मोहम्मद शमी, भुवनेश्वरकुमार व के.

बीसीसीआयची नवीन मोर्चेबांधणी

एल.राहुल या खेळाडूंशी निवड समिती संवाद साधण्याची शक्यता आहे. विराट कोहलीची शारिरीक तंदुरुस्ती पाहता त्याला टी-२० क्रिकेटसाठी आणखी एक संधी देण्यात येऊ शकते. निवड समितीकडून भारतातील एकदिवसीय विश्वकरंडकासाठी (२०२३) २० खेळाडूंची संभाव्य निवड करण्यात आली होती. आता निवड समितीला २०२४ मध्ये वेस्ट इंडिज येथे होणाऱ्या टी-२० विश्वकरंडकासाठी संभाव्य खेळाडूंची निवड करावयाची आहे.

जेणेकरून स्पर्धा नजीक येईपर्यंत भारताची संघ बांधणी झालेली असेल. यशस्वी जयस्वाल, ऋतुराज गायकवाड, रिंकू सिंग, रवी बिश्नोई यांसारख्या खेळाडूंना भारताच्या टी-२० संघात स्थान देण्यात येण्याची शक्यता आहे.

विश्वचषकापूर्वीच पाकचे रडगाणे

। इस्लामाबाद । वृत्तसंस्था ।
भारतात होणाऱ्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेची उत्सुकता तमाम क्रिकेट शौकिनांना लागलेली आहे.या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी पाकिस्तानी संघही भारतात येणार आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील विश्वचषकामधील सामना १५ ऑक्टोबरला अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर होणार आहे. त्याआधीच पाकिस्तानचा माजी क्रिकेटपटूने टीम इंडियाला गोलंदाजीवरून टोमणा मारला आहे. भारतीय गोलंदाजी पाकिस्तानी फलंदाजांना अजिबात आव्हान देऊ शकणार नाही, असे अजमलने मोठे विधान केले.

भारतीय गोलंदाजी कमकुवत; फिरकीपटू अजमलची टीका

सामन्याआधी आतापासूनच पाकिस्तानने माइंड गेम खेळण्यास सुरुवात केली आहे. या यादीत आता पाकिस्तानचा माजी फिरकीपटू सईद अजमलने मोठे वक्तव्य केले आहे. पाकिस्तान संघ ही स्पर्धा जिंकण्यासाठी फेव्हरेट आहे, असे त्याचे मत आहे. भारतीय गोलंदाजी पाकिस्तानी फलंदाजांना अजिबात आव्हान देऊ शकणार नाही, असे अजमलला वाटते. भारतीय गोलंदाजी कमकुवत असल्याचे विधान करत त्याने एकप्रकारे भारताला डिवचले.

पाक जिंकण्याची ६० टक्के शक्यता

विश्वचषकामध्ये पाकच्या विजयाची शक्यता ६० टक्के आहे. भारताची फलंदाजी नेहमीच मजबूत राहिली आहे. आमची गोलंदाजी मजबूत असल्याने आम्ही त्यांना मात देऊ शकतो, ही लढत बरोबरीची असेल. या क्षणी मी म्हणेन की पाकिस्तान जिंकण्याची ६०% शक्यता आहे. पाकिस्तान संघ विश्वचषक जिंकणारा फेव्हरेट संघ आहे. भारताची परिस्थिती आणि पाकिस्तानकडे असलेले गोलंदाज पाहता जर आमच्या संघाने भारताला कमी धावसंख्येपर्यंत रोखले तर पाकिस्तान नक्की जिंकेल.

भारताची गोलंदाजी पाकिस्तानइतकी धारदार कधीच नव्हती. भारतीय गोलंदाजी नेहमीच कमकुवत राहिली आहे. अलीकडच्या काळात फक्त मोहम्मद शमी आणि सिराजनेच चांगली गोलंदाजी केली आहे. फिरकीपटूंमध्ये विश्वचषकात रवींद्र जडेजा महत्त्वाचा खेळाडू भारतासाठी आहे. जसप्रीत बुमराह पाकिस्तानसाठी धोका ठरू शकतो, पण तो बऱ्याच काळापासून अनफिट आहे. अशा स्थितीत भारताची गोलंदाजी पाकिस्तानसाठी फारशी धोक्याची ठरेल, असे मला वाटत नाही.
-अजमल, माजी फिरकीपटू

प्रवीणकुमारला अपघात

। मेरठ। वृत्तसंस्था ।

भारतीय संघाचा माजी खेळाडू प्रवीण कुमारचा मेरठ शहरात कारमधून जात असताना अपघात झाला. त्याच्या कारला भरधाव वेगाने येणाऱ्या कंटेनरने धडक दिली. त्यावेळी प्रवीणसोबत त्यांचा मुलगाही कारमध्ये होता आणि दोघेही या अपघातातून थोडक्यात बचावले.

याप्रकरणी पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपी कंटेनर चालकाला घटनास्थळावरून ताब्यात घेतले. प्रवीण कुमार मेरठमधील पांडव नगर येथून त्याच्या लँड रोव्हर डिफेंडर कारने येत होता. यानंतर त्याची कार आयुक्तांच्या निवासस्थानाजवळ पोहोचले असता, त्याचवेळी त्याच्या कारला कंटेनरची धडक बसली. यानंतर गाडीचे मोठे नुकसान झाले. या अपघातात प्रवीण आणि त्याचा मुलगा थोडक्यात बचावले.अपघातानंतर सिव्हिल लाईन पोलीस ठाण्याच्या पोलिसांनी तत्काळ घटनास्थळ गाठून कंटेनर चालकाला ताब्यात घेतले. या अपघाताबाबत सीओने सांगितले की, प्रवीण कुमार आणि मुलगा पूर्णपणे सुरक्षित आहेत. प्रवीण कुमार यांचे घर मेरठ शहरातील बागपत रोडवर असलेल्या मुलतान नगरमध्ये आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)